
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. 92059



# गांधीजी व त्यांचे सहकारी

IRBK-0112951

दा. न. शिखरे

ग्रं. न. क्रं. १२५४७

(७६५७)

३०।३।०७

३६४०

# गांधीजी व त्यांचे सहकारी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १२०५७ नों. दि ...............
वि. ९/१/५ ............ क्र. ...............

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ०६५५७१ दि ......
क्रमांक...३८४०....नोंद दि....३०।३।७९

# गांधीजी व त्यांचे सहकारी

लेखक

दा. न. शिखरे

IRBK 0112951
IRBK-0112951

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणे

प्रकाशक
अ. ज. प्रभु
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३३४ शुक्रवार : पुणे २

सर्व हक्क सुरक्षित

आवृत्ती पहिली
१४ नोव्हेंबर १९६९

किंमत रुपये तीन

मुद्रक
वि. ग. साटे
विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा.) लि.
४८५ नारायण : पुणे ३०.

# प्रकाशकाची भूमिका

आतापर्यंत श्री. शिखरे यांची तीन पुस्तके मी प्रकाशित केली आहेत. त्यांचे हे चौथे पुस्तक प्रसिद्ध करताना मला विशेष आनंद वाटतो. तसाच आनंद, मराठी वाचकांना, हे पुस्तक वाचताना वाटेल, असा मला विश्वास वाटतो.

श्री. शिखरे यांनी शंभरावर पुस्तके लिहिली व त्यांत सुमारे ५० चरित्रे आहेत. त्यांपैकी बहुतेक चरित्र-नायकांच्या मुलाखती त्यांनी चरित्र-लेखनाच्या आधी मिळविल्या. चरित्र-लेखनासाठी, किंवा अन्य निमित्ताने, मिळालेल्या या मुलाखतींचा हा पहिला संग्रह आज मी प्रसिद्ध करीत आहे. त्यांत भारतीय कीर्तीच्या थोरथोर नेत्यांचे, आजवर अज्ञात असे, हृद्गत आलेले असल्यामुळे, भारताच्या इतिहासांत त्यांना आगळे महत्त्व आहे, असे मला वाटते. महाराष्ट्रीय नेत्यांच्याही, श्री. शिखरे यांनी घेतलेल्या, अशाच मुलाखतींचा दुसरा संग्रहही प्रसिद्ध करण्याचा माझा मानस आहे. त्यात स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकनायक अणे, शंकरराव देव, डॉ. हेडगेवार इत्यादि महाराष्ट्र-नेत्यांच्या मनोगतांची प्रतिबिंबें दिसतील.

अर्थात्, ही काही संपूर्ण व सांगोपांग चरित्रे नव्हेत—पण त्या त्या चरित्रावर अगदी नवा, अगदी जिव्हाळ्याचा प्रकाश पाडणारी ही ओझरती दर्शने होत. सहज बोलता—बोलता घडलेली दर्शने म्हणजे त्या त्या महा-पुरुषांच्या मनाची, स्वभावाची, आचाराची क्षण-चित्रेच. मराठीमध्ये अशा मुलाखतींची पुस्तके आहेत, पण थोडी; त्यांत या पुस्तकाने महत्त्वाची भर पडेल, असे मी मानतो.

म. गांधींचा 'आतला आवाज' व स्वातंत्र्य—वीर सावरकरांविषयींचा अभिप्राय, प. नेहरूंचा गांधीवादाकडे पहाण्याचा दृष्टिकोन, डॉ. राजेंद्र-प्रसादांचे स्वतंत्र भारत सरकाराविषयींचे मत, डॉ. राधाकृष्णन् यांचा साक्षात्कारी पुरुषांचा अनुभव, आचार्य विनोबांचे ब्रह्मप्राप्तीविषयीचे स्व-गत, मार्थी जयप्रकाशजींनी दाखविलेली मार्क्सवादांतील अपूर्णता—इत्यादि

किती तरी नव्यानव्या गोष्टी या मुलाखतींतून वाचावयास मिळतात. यापूर्वी त्या प्रसिद्ध करणे कदाचित् अनुचित ठरले असते. पण आता इतिहासाचा अंश म्हणून, हे सत्य-कथन प्रकाशात येणे हिताचे आहे, अशा जाणिवेने हे पुस्तक मी प्रसिद्ध करीत आहे. त्याचे स्वागत मराठी वाचकवर्ग उत्साहाने करील असा मला भरंवसा वाटतो.

विदर्भ मराठवाडा
बुक कंपनी, पुणे.

अ. ज. प्रभू

# अ नु क्र म


| | |
|---|---|
| १. महात्माजींचा प्रसाद | १० |
| २. राजर्षी राजेंद्रप्रसाद | ३० |
| ३. पं. नेहरूंचे विचार-धन | ३९ |
| ४. तत्त्वज्ञ राधाकृष्णन् | ४६ |
| ५. महामना मालवीयजी | ५२ |
| ६. जयप्रकाशजींच्या सान्निध्यात | ५८ |
| ७. विनोबांच्या पदयात्रेत | ६६ |
| ८. आचार्य कालेलकरांच्या सहवासात | ७४ |
| ९. मावळंकरांचा प्रेमळपणा | ८० |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ०.६५.०९ f, आ:वा.
क्रमांक ३६४० नोंद दि ३०।३१.०९



महात्मा गांधी

# १

## महात्माजींचा प्रसाद

लोकमान्य गेले – आणि महात्माजी आले.

लो. टिळक ता. १ ऑगस्ट १९२० रोजी दिवंगत झाले आणि त्याच दिवशी म. गांधींनी असहकारितेचे रणशिंग फुंकले.

जेव्हा टिळकांच्या जीवनाचा अस्त झाला, तेव्हाच गांधीजींच्या भारतातील राजकीय जीवनाचा उदय झाला.

नियतीने नवा दुवा जोडून भारतीय नेत्यांची साखळी अभंग राखली.

लोकमान्यांच्या निधनाच्या वार्तेमुळे अखिल राष्ट्रावर सुतकी कळा पसरली. अशा वेळी, म. गांधींची धीरगंभीर वाणी 'यंग इंडिया'तून माझ्या मनात शिरत होती. त्यांनी सर्व राष्ट्राला धीर देऊन सांगितले, "मानवातील एक महापुरुष पतन पावला, सिंह–गर्जना स्तब्ध झाली. स्वराज्य–संपादनाच्या प्रयत्नात मी लोकमान्यांच्या शिष्योत्तमांचे खांद्यास खांदा लावून कूच करीन." त्या सांत्वनामुळे, त्या संदेशामुळे, दु:खी राष्ट्रही शांत झाले व धीर धरून नव्या लढ्यास प्रवृत्त झाले. अशा वातावरणात १९२० साली माझ्या अंगावर नखशिखान्त खादी चढली – साऱ्या शाळेत तसा मी एकटाच होतो. मला वाटले,

लोकमान्यांच्या स्वदेशीची परिणती गांधीजींनी खादीमध्ये केली, बहिष्काराचा विकास असहकारितेत केला आणि स्वराज्याचा विस्तार स्वातंत्र्यामध्ये केला. गांधीजी हे लोकमान्यांचेच दुसरे अवतार होत, ही माझी भावना झाली; आणि त्यांचेवर माझी तशीच भक्ती जडली.

"यंग इंडिया" या गांधीजींच्या इंग्रजी साप्ताहिकाचे वाचन मी नियमितपणे करीत असे. त्यातील भाव किंवा आशय मला कळे थोडा, पण उपनिषदासारखी किंवा बायबलसारखी असलेली त्यांची भाषा हृदयास सरळ जाऊन भिडे. अगदी जरूर तेवढेच शब्द, तेही शक्य तितके सोपे आणि छोटी छोटी वाक्ये; पण त्यांच्या पोटात उत्कट भाव किंवा उदात्त विचार भरलेला. त्यामुळे गांधीजींचे लेख माझ्या हृदयाची विलक्षण पकड घेत, आणि अंतःकरणात वाढू लागलेल्या गांधी-भक्तीच्या वेलीला खतपाणी घालीत.

अशा मनोभूमिकेत मी असताना आणि सांगलीच्या कॉलेजमध्ये शिकत असतांना, १९२३ मध्ये, म. गांधींचे भाषण सांगली येथे मारुती-मंदिरासमोरच्या पटांगणात झाले. सभेस प्रचंड गर्दी झाली होती. त्या वेळी त्यांना मिळालेल्या वस्तूंचा लिलाव ५।५ शे रुपयांना सभेत करण्यात आला, हे मला अजून आठवते.

त्यानंतर १९२४ साली बेळगाव येथे गांधीजींच्या अध्यक्षतेखाली जी काँग्रेस भरली, तिला मी हजर राहिलो. पण तेथे गांधीजींनी माझा हिरमोड केला. त्यांनी आपले अध्यक्षीय भाषण अत्यंत संक्षिप्त केले. त्यामुळे ते अधिवेशन कल्पनेपेक्षाही फार लौकर आटोपले. पण माझ्या सुदैवाने त्या अधिवेशनाच्या अनुषंगाने इतर छोटचा छोटचा परिषदा पुष्कळ भरल्या होत्या. त्या मला पहावयास मिळाल्या. त्यात एक लिंगायत परिषद होती. लोक खूप जमले होते आणि वक्ते बोलत होते. इतक्यात. गांधीजी परिषदेत आले-अगदी लगबगीने, धावत-पळत म्हटले तरी चालेल. कमरेला खादीचा पंचा गुंडाळलेला आणि पाठीवर तसाच दुसरा पंचा पांघरलेला अशा, वेष नसलेल्या वेषात, ५५ वर्षांचा तो वृद्ध नेता इतक्या त्वरेने-वेगाने चालत आहे आणि तेही बरोबरच्या माणसाशी मोकळेपणाने हसत व बोलत चालत आहे, याचेच मला मोठे

नवल वाटले. कारण अन्य राजकीय पुढारी म्हणजे उग्र मुद्रेचे, गंभीर प्रकृतीचे, तापट स्वभावाचे, जड पांडित्याचे इ. इ. असे दिसावयाचे आणि आम्ही त्यांना फार दुरून मनातल्या मनात वंदन करावयाचे. पण गांधीजींचा सारा कारभार उघडा, मोकळा–पहाटेच्या थंडगार वायुलहरींसारखा. माझ्या एका स्नेह्याची भक्तिभावना तर इतकी की, गांधीजी तेथे असे लगवगीने चालले असताना तो त्यांना खेटून चालू लागला आणि चालता चालता त्याने हळूच गांधीजींची एक चोरी केली.

चोरण्यासारखे गांधीजीजवळ होतेच काय ?

पण त्याने गांधीजींच्या पंचाचा एक धागा नकळत ओढून घेतला आणि जन्मभर तो आपल्या देव्हाऱ्यात ठेवून त्याची पूजा तो करीत राहिला ! हे ऐकल्यावर मला आठवले, सिलोनमध्ये बुद्धाचा दात किंवा गोव्यामध्ये खिरस्ती संताचे शव किती पूजिले जाते ! अशी भक्ती, अशी श्रद्धा कोणावरही ठेवणाऱ्या माणसाचे मन प्रसन्न झाल्याशिवाय कसे राहील ?

पण माझी भक्ती तशी नव्हती, ती डोळस होती, चिकित्सक होती, स्वतःच्या बुद्धीच्या प्रकाशात चालणारी होती. म्हणून मी गांधीजींच्या पत्राचे किंवा प्रतिमेचे असे "देव्हारे" माजविले नाहीत. उलट, बेळगावच्या त्या लिंगायत– परिषदेतील गांधीजींचे भाषण ऐकून माझी तर्कप्रधान बुद्धी हसूच लागली. कारण, लिंगायत समाजातील दोन पक्षांच्या भांडणांचा उल्लेख त्या परिषदेत झाला होता; आणि ते मिटविण्याचा तोडगा आपण सांगावा, अशी विनंती गांधीजींना करण्यात आली होती. गांधीजींनी फक्त ५ मिनिटे भाषण केले, आणि आपला तोडगा सांगितला. तो कोणता ? तर, "चरखा चालवा." वहात्तर रोगावर एक मात्रा, तसा गांधीजींना चरखा. खेड्यांचे दारिद्र्य घालवावयाचे आहे ना ? तर, चालवा चरखा. भारताला स्वातंत्र्य पाहिजे आहे ना ? तर, चालवा चरखा. हिंदु-मुसलमानांचे ऐक्य पाहिजे आहे ना ? तर, चालवा चरखा. हा एकच संजीवनी मंत्र त्यांनी जन्मभर राष्ट्राला दिला. त्यामुळे राष्ट्रातील जनतेची संघटना, पूर्वी कधी नव्हती इतकी, बांधली गेली. चरखा चालविणाऱ्या प्रत्येक स्त्री-

पुरुषाला वाटे, राष्ट्रीय कार्यांत, स्वातंत्र्य-संग्रामात, माझाहि कांहा भाग आहे. "दोन घास देणारा चरखा एखाद्या विधवेच्या हाती कामधेनुसारखा राहील, पण तोच चरखा जवाहरलालांच्या हाती गेला तर मशीनगनचे काम करील.'' असे गांधीजी म्हणत.

१९२७ साली मी बी. ए. च्या वर्गात असताना गांधीजी पुण्यास आले होते. दिवसभरच्या कार्यक्रमांनी व भाषणांनी ते थकून गेले होते. तरी, आम्हां विद्यार्थ्यांच्या आग्रहामुळे, रात्री ९।। वाजता, ते भाषण करण्यास आले. नू. म. वि. च्या पटांगणात विद्यार्थ्यांची खेचाखेच झालेली. गांधीजी व्यासपीठावर जाऊन बसले. तोच काही विद्यार्थ्यांनी गलगा केला, "इंग्रजीतून बोला! इंग्रजीतून बोला!'' गांधीजींची इच्छा हिंदीतून बोलण्याची होती, पण विद्यार्थी कसले ऐकतात? त्यांचा गोंधळ वाढतच गेला. मला वाटले, आता सभा मोडणार. पण गांधीजींचे व्यवहार-चातुर्य पुढे आले, आणि त्यांनी एकदम इंग्रजीतून बोलण्यास सुरुवात केली, त्याबरोबर सारे गप्पगार झाले.

"My limbs are tired and I wish to retire" असे पहिलेच वाक्य गांधीजी सहज बोलून गेले. पण त्यातील श्लेषाची मोहिनी आम्हा विद्यार्थ्यांच्या मनावर पडली, आणि सभेत शांतता पसरली. मग त्यांनी एकदम हिंदीतून भाषण करावयास सुरुवात केली. लेखनाप्रमाणे गांधीजींचे वक्तृत्व पकड घेणारे नसे. त्यांच्या "आत्मकथेत'' वक्तृत्व नसल्याचे प्रसंग पुष्कळच आलेले आहेत. हजारो – लाखो लोक त्यांची भाषणे ऐकून घेत, ते त्यांच्या अद्वितीय व्यक्तिमत्त्वामुळे. नाही तर, ती पुष्कळ वेळा कंटाळवाणीच होत. फार काय, १९४२ साली मुंबई येथे "चले जावच्या'' इतिहासप्रसिद्ध ठरावावर त्यांनी इंग्रजीतून व हिंदीतून राष्ट्राला पेटविणारी जी भाषणे केली, तीही लांबलचक, कंटाळवाणी अशीच मला वाटली. पण त्या भाषणांचे पाठीशी केवढी तेजस्वी तपस्या, केवढे करोल कर्तृत्व व किती शुद्ध चारित्र्य उभे होते! त्यामुळे त्यांचा प्रत्येक शब्द वेदवाक्यासारखा झेलला जाई–आचरिला जाई.

अशा सभा–परिषदांमधून गांधीजींची भाषणे ऐकणे म्हणजे गंगेचे दुरून दर्शन घेणे. तेही काही कमी रम्य नसते. मी जेव्हा

हृषीकेशला गेलो आणि लक्ष्मण–झूल्यावर चालू लागलो, तेव्हा माझी नजर सहज उजवीकडे वळली. आणि अकस्मात् – ओ हो! गंगेचा लहानसा पण चांदीसारखा पांढरा – स्वच्छ प्रवाह दृष्टीस पडला – आणि तो पहाता–पहाता मी देहभान हरपून गेलो. अशी नदी मी कोठे पाहिलीच नव्हती. काय ते स्वर्गीय सौंदर्य! पण प्रत्यक्ष स्नानाचा आनंद काही आगळाच. काशी–क्षेत्री विशाल गंगा-प्रवाहात अवगाहन करताना, माझे अंगन्अंग किती निर्मल, शुद्ध, पवित्र झाले! तसा सर्वांगाला व्यापून टाकणारा अलौकिक आनंद मला झाला, गांधीजींच्या प्रत्यक्ष भेटीत. जवळ जवळ बसून, समोरा-समोर पाहून, एकमेकांशी प्रश्नोत्तरे करण्यात, समीपतेचा आनंद सहजच लाभला.

"एकवेळ समुद्रात बुडी मारून, त्याचा तळ शोधणे सोपे आहे, पण महात्माजींच्या मनाचा थांग लागणे कठीण आहे.'' असे एका इंग्रज लेखकाने लिहिले आहे. पण मला अनुभव आला उलटा. त्यांचे सारे जीवन म्हणजे एक उघडा धर्मग्रंथ. त्यात आत-बाहेर काही नाही. लाख माणसांपुढे जितक्या आस्थेने व जबाबदारीने ते बोलत, तितकेच एका माणसापुढेही ते तोलून-जोखून शब्द वापरीत, मग तो एक माणूस, दिल्लीचा व्हाइसरॉय असो किंवा पुण्याचा शिखरे असो. अत्यंत प्रेमाने, जिव्हाळ्याने, मनमोकळेपणाने, हास्य–विनोद करीत, गांधीजींनी मला पहिली मुलाखत दिली.

ही पहिली मुलाखत कोठे घडली ?

★

येरवड्याच्या तुरुंगात!

१९३२ साली ब्रिटिश सरकारने आपला 'जाति-निर्णय' प्रसिद्ध केला; आणि अस्पृश्य-वर्ग हिंदु-समाजापासून निवडणुकीमध्ये निराळा काढला. असा भेदभाव केल्यास "मी प्राणपणाने प्रतिकार करीन.'' अशी घोषणा गांधीजींनी लंडनच्या 'गोलमेज परिषदेत' केली होती. पण तेथे जमलेल्या मुत्सद्द्यांना वाटले, हा केवळ भाषेचा एक अलंकार असेल, पण गांधीजींची सत्यनिष्ठा हरिश्चंद्रासारखी– स्वप्नांतील शब्दही खरे करणारी. येरवड्याच्या तुरुंगात असताना त्यांनी सरकारच्या

जाति-निर्णयाची वार्ता वाचली, आणि त्यांना आपल्या भीष्म-प्रतिज्ञेची आठवण झाली. त्या प्रतिज्ञेप्रमाणे, तो निवाडा रद्द होईपर्यंत किंवा देहात प्राण असेपर्यंत, आपण उपोषण करणार, अशी घोषणा त्यांनी तुरुंगांतूनच केली. त्याबरोबर तुरुंगाच्या भिंती हादरल्या–सारे राष्ट्र दचकले– सारे जगही चपापले !

तो अनंत–चतुर्दशीचा दिवस होता. आम्ही त्यांचे भक्त तर हतबुद्ध झालो–आमचा जीव कासावीस होऊ लागला–मस्तक सुन्न झाले. एका स्नेह्यावरोबर मी विठ्ठलवाडीच्या निर्जन भागात शून्य मनाने उगाच भटकत राहिलो.

पण काय चमत्कार ! अवघ्या पाच दिवसात ब्रिटिश सरकारने आपला निर्णय वदलला. एका कृश माणसाने, तुरुंगाच्या खोलीत वसून, साम्राज्याची पोलादी पहार लीलेने वाकविली. सशस्त्र युद्ध करून काही इतक्या लौकर, एवढा थोरला विजय, कोणा सेनापतीला संपादन करता आला नसता. गांधीजींच्या आत्म-वलाने साम्राज्याच्या पाशवी बलावर सरशी केली !

या विजयाचा विशेष लाभ म्हणजे सारा भारत हलला–अस्पृश्यांच्या प्रश्नाबावत जागा झाला–त्यांच्या स्थितीकडे सहानुभूतीने पाहू लागला. गांधीजी अस्पृश्यता–निवारणाचे विराट चक्र कारागृहात अष्टौप्रहर फिरवीत राहिले. लो. टिळक काय, म. गांधी काय–ज्या वेळी जो विषय ते आपल्या हाती घेत, त्याचाच त्यांना एक ध्यास–तोच त्यांना एक छंद ! सारे प्रयत्न त्या एकाच साध्यासाठी–जणू आपले सर्व जीवनच त्या एका कार्याला वाहिलेले. "विषय तो त्यांचा झाला नारायण" अशी तुकोबांची तन्मयता–तदाकार वृत्ती त्यांची झालेली. त्या वेळी गांधीजींनी याच कार्यासाठी "हरिजन" नावाचे इंग्रजी साप्ताहिक काढले होते. त्या वेळी ते लिहीत, ते हरिजनासंबंधी; ते बोलत तेही हरिजनासंबंधी. हरिजनांच्या कार्याविषयी कोणाला बोलावयाचे असेल तरच गांधीजींची मुलाखत त्या तुरुंगात मिळावयाची. म्हणून मीही, त्याच विषयाचे निमित्त करून, गांधीजींची मुलाखत मागितली. सरकारने परवानगी दिली आणि ता. ५ जानेवारी १९३३ रोजी मी गांधीजींच्या प्रत्यक्ष सहवासात गेलो.

येरवड्याच्या तुरुंगाचे ते अजस्र दार म्हणजे जणू यमाचा जबडाच.

त्याच्या वाहेर कैद्यांच्या शृंखलांचा होणारा खळखळाट, खांद्यावर बंदूक टाकून शिपायांची चाललेली गस्त, हे सारे उग्र दृश्य भय उत्पन्न करणारे होते. दाराआडून, लोखंडी गजांच्या फटीतून, धिप्पाड पोलिसांनी माझे नाव पुकारले, आतून भलेमोठे कुलूप उघडले गेले आणि त्या महाद्वाराच्या दिंडीतून आमची स्वारी तुरुंगात शिरली. लोकमान्य टिळक, चाफेकर-बंधु, वासुदेव वळवंत, अशा कैक देशभक्तांनी पावन केलेल्या त्या बंदी-शाळेत पाऊल ठेवताच माझ्या चित्तात असंख्य स्मृती गुंजारव करू लागल्या. त्या अवस्थेत मला पोलीसांनी आत नेले आणि डाव्या हाताच्या कोठडीत सोडले.

वाहेर तमोगुण, तर आत सत्त्वगुण. सत्त्वगुणांचा पुतळा असलेले गांधीजी एका साध्या खाटेवर पहुडलेले होते. कोठडीच्या अंगणातील एक लहानसर आम्रवृक्ष त्यांच्यावर पानांच्या चवऱ्या वारीत होता. त्यांच्यासमोर चार–पांच खुर्च्यांवर काही थोर मंडळी बसलेली होती. गांधीजींचे परमभक्त हरिभाऊ फाटक यांच्यावरोवर मी तेथे गेलो होतो. लो. टिळकांच्या "केसरी" पत्राचा सहसंपादक, म्हणून मला मुलाखतीला मुवलक वेळ मिळाला होता. मुलाखत इंग्रजी भाषेतून झाली. त्या मुलाखतीचा सारांश, गांधीजींचे पट्टशिष्य, महादेवभाई देसाई यांनी, मुंवईच्या "फ्री प्रेस" या इंग्रजी दैनिकात प्रसिद्ध केला, तो सवंध एक पानभर – पाच-सहा स्तंभ. त्याशिवाय महादेवभाईंनी आपल्या डायरी-तही या मुलाखतीची विशेष नोंद केली. "महादेवभाईकी डायरी" (हिंदी) याच्या तिसऱ्या भागात जवळ जवळ तीन पाने या मुला-खतीने व्यापली आहेत, कारण हरिजनांचा प्रश्न हा तेव्हा अखिल राष्ट्राच्या जिव्हाळ्याचा प्रश्न झाला होता.

सरकारनेही त्याच विषयावर बोलण्यासाठी गांधीजींना मुलाखतीची मुभा दिली होती. माझ्या मुलाखतीचा विषयही तोच एक होता. हरिजनांच्या मंदिर–प्रवेशासंबंधी त्या वेळी सनातन व सुधारक यांच्यामध्ये वादाचे मोठे वादळ उठले होते. त्या वादळातून गांधीजींना अस्पृश्यता–निवारणाचे तारू कुशलतेने न्यावयाचे होते. इतर सज्जनही समेटाचे मार्ग शोधीत होते. त्यापैकी एका महाशयाने अशी तडजोड सुच-विली होती की, दिवसातील काही विशिष्ट वेळी अस्पृश्यांना मंदिर खुले

ठेवावे. पण यामुळे देव-दर्शनाचा लाभ त्यांना झाला तरी, अस्पृश्यता नाहीशी कशी होणार ? असा प्रश्न मी गांधीजींना केला, तेव्हा त्यांनी उत्तर दिले :–

"विरोधी पक्षाच्या भावनेचा आदर करण्याचा हेतु यात आहे. अन्य हिंदूंबरोबर हरिजनही मंदिरात जाऊन देवाचे दर्शन घेऊ शकतील."

"पण यामुळे हरिजन व सनातनी यांच्यामध्ये अलगपणा राहून संघर्ष उत्पन्न होणार नाहीत काय ?"–मी.

"माझे सारे जीवन अशाच तऱ्हेने गेले आहे की, त्यामुळे सर्व प्रकारचे संघर्ष मिटावेत. संघर्षाचे कारण दूर करण्याचा माझ्याइतका प्रयत्न साऱ्या दुनियेमध्ये दुसऱ्या कोणीही केला नाही, असा निर्णय इतिहास देईल. अस्पृश्यतेचा प्रश्न सोडविण्यापूर्वी जर मी मेलो, तर स्पृश्य हिंदू व हरिजन हे तलवार उपसून गृहयुद्ध सुरू करतील असे खास समजा. स्पृश्य हिंदू जनतेपासून हरिजनांना अलग ठेवून त्यांची सुधारणा करावी, असे काही लोक सुचवितात. "अशा प्रकारे होणारी तुमची मदत आम्हाला नको. तुमच्यासारखे सुधारक बाजूला ठेवून आम्ही आमची सुधारणा करू." असे हरिजन म्हणतात. ते तसे करू शकतील असा मला विश्वास आहे. पण त्याचे परिणाम भयंकर होतील. माझ्या आयुष्यातील क्षणाक्षणाला मी हिंदु धर्माचे पालन करीत असतो. मला असे दिसत आहे की, सध्या हिंदू धर्मासमोर सर्वनाशाचे भय उत्पन्न झालेले आहे. हिंदू धर्मासाठी हजारो माणसे आपल्या प्राणांची कुरवंडी करावयास तयार न होतील तर, हिंदु धर्माचा नाश निश्चित होईल. आजकाल तर भिन्नभिन्न धर्मांमध्ये स्पर्धा चालू आहेत आणि सारे धर्म लढणारे आहेत. हिंदू धर्म मात्र निषेधात्मक बनला आहे. त्याने सर्व गुणांनाही नकारात्मक स्वरूप दिले आहे. अशा निषेधात्मक वृत्तीच्या हिंदू धर्माचा मी इन्कार करतो. हिंदू धर्माच्या मोठ्या कसोटीचा हा प्रसंग आहे. आणि त्यातील सर्वात मोठी कसोटी म्हणजे अस्पृश्यता. आमच्या मंदिरामध्ये फार घाण असते असे काही लोक म्हणतात. त्यांच्याशी मी सहमत आहे. परंतु त्या कारणामुळे त्या मंदिराचा नाश करावा, हे मत मला मान्य नाही. मंदिरांचा विनाश मला नको, त्यांची सुधारणा मला पाहिजे. अस्पृश्यतेचे विष निपटून

काढल्याशिवाय हिंदू धर्माची सुधारणा होणे शक्य नाही. ''

" हरिजनांना मंदिर-प्रवेशासाठी स्वतंत्र वेळ ठेवला तर सनातनी लोक अल्पसंख्य रहातील, आणि हरिजनांबरोबर जाणारे सुधारक बहुसंख्य होतील, असे आपल्याला वाटते काय ?''

" होय. माझी तशी समजूत आहे. हरिजनांनी भिकारी बनून मंदिरात जावे असे मला वाटत नाही. अर्थात् परमेश्वरापुढे भिकारी म्हणूनच जावे लागते, पण मनुष्यापुढे नाही. ''

" अस्पृश्यतेप्रमाणेच जातीभेदही नष्ट व्हावेत, असे आपल्याला वाटते काय ?''

" अस्पृश्यता–निवारणाच्या प्रश्नाचा जातीभेद नष्ट करण्याच्या प्रश्नाशी काही संबंध नाही. माझे मत आपण विचारीत आहात, तर ते मी अवश्य देतो. मला माझे विचार लपवावयाचे नाहीत. मी असे मानतो की, वेद अनंत आहेत. गीता–मातेकडून मी माझ्या साऱ्या शंकांचे समाधान करून घेतो. गीता आणि अन्य सर्व शास्त्रे या सर्वांचे सार मी असे काढले आहे की, वर्ण–संकर म्हणजे विषयवासनेने केलेला संभोग. गीतेच्या पहिल्या अध्यायाचे शेवटी अर्जुन जेव्हा वर्णसंकराची गोष्ट काढतो, तेव्हा त्याच्या मनामध्ये याशिवाय दुसरा विचार नव्हता. त्याला असे वाटत होते की, युद्धात पुरुषांचा नाश झाला म्हणजे स्त्रिया हरतऱ्हेने आपल्या विषयाची तृप्ती करून घेतील. पुरुष किंवा स्त्री कोणत्याही वर्णाची असली तरी, केवळ संतान-उत्पत्ती व मानव-जातीची सेवा करण्याच्या इच्छेने व शुद्ध प्रेमाने केलेला समागम संकर होत नाही.

"संकर शब्दाचा हा आपण नवाच अर्थ लावीत आहात. 'संकरो नरकायैव ' हे म्हणताना अर्जुनाच्या मनात आपला अर्थ नसावा, असे मला वाटते.'' असे मी धाडसाने बोलून गेलो. पण गांधीजींनी तो अधिक्षेप मानला नाही. कोणतेही मत, कोणताही विचार, कोणतीही योजना ऐकण्यासाठी त्यांच्या मनाचे दरवाजे नेहमी उघडे असत. कोणाचाही अवमान नाही, तिटकारा नाही की रागही नाही. प्रेममूलक अहिंसेचेच ते एक लक्षण. गांधीजींनी जवळच बसलेल्या एका तर्कतीर्थ शास्त्रीबुवांकडे वळून पाहिले, आणि त्यांना विचारले, " काय शास्त्रीजी, मी म्हणतो तो

संकराचा अर्थ बरोबर आहे ना ? ''

"हो ! हो ! '' असे ठासून म्हणून, शास्त्रीबुवांनी आधारासाठी लगेच एक संस्कृत श्लोक म्हणून दाखविला. मी आ वासून पहात राहिलो. महादेवभाईही चकीत झाले असावेत. कारण दुसरे दिवशी आपण वर्णसंस्कारासंबंधी बापूजींकडून खुलासा मागितला, व तो त्यांनी दिला असे महादेवभाईंनी आपल्या डायरीत लिहून ठेवले आहे.

त्यानंतर मी वर्ण–व्यवस्थेसंबंधी गांधीजींना प्रश्न केला. तेव्हा त्यांनी उत्तर दिले,

"वर्ण जन्माने प्राप्त होतो, हे मी मान्य करतो, पण वर्णाचा अर्थ काही विशिष्ट अधिकार, असा नाही––कर्तव्य किंवा धर्म असा आहे. ब्राह्मणाने अध्ययन–अध्यापन करणे, हे त्याचे कर्तव्य होय. ब्राह्मण पुरुष व शूद्र स्त्री यांचा संबंध म्हणजे वर्ण–संकर, असे मी मानीत नाही. जेथे विषयवासना आली, तेथे संकर झाला असे मी मानतो.'' गांधीजी ठामपणें म्हणाले. मी दुसऱ्या विषयाकडे वळून विचारले,

"आतला आवाज ' आपल्याला जो मार्ग दाखवितो, त्याने आपण जाता. पण " आतला आवाज'' म्हणजे काय ? एकाग्रतेने चिंतन केले असताना जो विचार स्फुरतो, तोच ' आतला आवाज' काय? ''

"मुळीच नाही. माझा ' आतला आवाज ' हा ईश्वराचाच संदेश असतो. तो अगदी खरा आहे, याविषयी मला काडीमात्र शंका नाही. ईश्वरच माझ्या हातून आपल्याला हवे असलेले कार्य करून घेत आहे, अशी माझी पूर्ण श्रद्धा आहे. जन्मभर या तुरुंगाच्या कोठडीत मला कोंडून ठेवले, तरी ईश्वराने योजलेले माझे कार्य थांबणार नाही, असा माझा पुरेपूर विश्वास आहे. ''

"हा ' आतला आवाज ' कशाने ऐकू येतो ? '' –मी.

"लोकमान्य तिलकमहाराजांनी ते सांगून ठेवलेले आहे. यम-नियमांच्या साधनांनी देह–शुद्धी झाली, आणि जपाने व ध्यानाने चित्त – शुद्धी झाली, म्हणजे ईश्वर बोलू लागतो आणि ' आतला आवाज ' ऐकू येऊ लागतो. '' गांधीजींनीं स्थिर स्वरानें उत्तर दिले.

"आपली ईश्वरावरील श्रद्धा, त्या श्रद्धेने केलेली प्रार्थना, त्या-

बरोबर केलेले उपवास – या सर्वांचा विलक्षण परिणाम धार्मिक वृत्तीच्या हिंदू समाजावर सहजच होतो. पण खिशाला बसलेला चट्टा किंवा बंदुकीतून निघालेली गोळी – हीच ज्यांना समजते, त्या ब्रिटिश लोकांवर आपल्या प्रार्थना–उपवासादिकांचा परिणाम काय होणार? ''–मी.

"ब्रिटिश लोकांना कळतील असे वहिष्कार – कायदेभंग वगैरे उपाय माझ्या चळवळीत आहेतच की ! पण माझा सारा भरंवसा ईश्वरावर आहे. ईश्वराची इच्छा नसेल, असा एकही शब्द बोलण्याची माझी इच्छा नाही. माझे शब्द कोणी ऐकावेत, अशीही इच्छा मला नाही. पण क्रोडो लोक माझे शब्द ऐकतात, हा काही आधिभौतिक शक्तीचा परिणाम नाही, हे आपण ओळखले पाहिजे. ज्यांनी मला कधी पाहिले नाही किंवा ऐकले नाही, अशा कोटयवधी लोकांवर माझ्या कृत्याचा किंवा भाषणाचा परिणाम होतो, याचा अर्थ मी असा करतो की, ईश्वर माझ्यामार्फत काम करीत आहे. चंपारण्यात मी पूर्वी कधी गेलो नव्हतो आणि तेथील लोक मला ओळखीतही नव्हते. पण लाखो लोक माझ्याभोवती गोळा झाले. कशामुळे ? ज्याची वृत्ती पूर्ण अध्यात्ममय झालेली आहे, त्याचा प्रभाव जादूसारखा पडतो. ''

माझ्या या मुलाखतीचा आशय वरीलप्रमाणे देऊन महादेव-भाई लिहितात, "इतक्या महत्त्वाच्या गोष्टी बोलल्यानंतरही बापूंना कालच्यासारखा थकवा आला नाही. ''

इतकी सविस्तर मुलाखत इतक्या कळकळीने महात्माजींनी माझ्यासारख्या पामर माणसाला दिली, यामुळे माझे मन अगदी भारावून गेले–आणि त्यात भर टाकली गांधीजींनी, शेवटचे वाक्य उच्चारून. "Help me to the extent you can" ( तुम्हाला शक्य असेल तितकी मदत मला करा. ) यांत गांधीजींची मिशनरी वृत्ती जशी मला दिसली, तशीच माझी दुर्बलताही मला जाणवली आणि माझी चित्तवृत्ती संकोचली. कृतज्ञपणे व भक्तिभावाने त्यांच्या चरणांना वंदन करून मी त्यांचा निरोप घेतला, आणि अध्यात्ममय व उदात्त वातावरणात मन पोहत असतानाच मी घरी परतलो.

★

यानंतर आठ वर्षांनी गांधीजींची दुसरी मुलाखत घेण्याचा योग मला आला—आणि तीही त्यांच्या खुद्द आश्रमात. "देव पूजूनि पाहिजे" या न्यायाने गांधीजींना त्यांच्या आश्रमात भेटणे, हे मला विशेष आनंददायक वाटले. राजाला त्याच्या राजधानीत भेटावे, किंवा गवयाला त्याच्या मैफलीत ऐकावे, तसा हा योग.

'आश्रम ही माझी मूर्ती होय' असे गांधीजी म्हणत. कारण,त्यांच्या दृष्टीने, आश्रम म्हणजे "सामुदायिक धार्मिक जीवन". त्यांनी आपल्या आयुष्यात जे पाच आश्रम स्थापन केले, ते या धार्मिक दृष्टीनेच—ईश्वरी साक्षात्काराचे साध्य मिळविण्यासाठीच. "शांती, शक्ती व शुचिता यांचे स्थान म्हणजे आश्रम" अशी गांधीजींची भावना. त्यांचे ब्रीद–वाक्य त्यांनी स्वतःच लिहून ठेवले आहे, ते म्हणजे, "मानव-जातीची सेवा व त्या सेवेच्या द्वारा आत्म–साक्षात्कार करून घेणे." मानव–सेवेमध्ये देश–सेवा आली—आणि त्यात आली स्वातंत्र्याची प्राप्ती, अस्पृश्यांची मुक्ती, हिंदु–मुसलमानांची एकी. इ. इ.

वर्धा शहराजवळ पांच मैलावर सेगाव नावाचे एक खेडे होते. ते जमनालाल बजाज यांच्या मालकीचे होते. त्यांनी ते गांधीजींना गुरु-भक्तीने अर्पण केले. तेथे गांधीजींनी मानव–सेवेचे आपले व्रत चालविले-म्हणून 'सेगावचे' "सेवाग्राम" बनले. तेथे त्यांचा सत्याग्रह-आश्रम १९३६ साली स्थापन झाला. गांधीजी सेगावला प्रथम गेले, तेव्हा तेथे जाण्यास धड रस्तादेखील नव्हता, मग त्या खेड्यात पोस्ट-ऑफिस कुठले ? पण गांधीजी तेथे गेले— अगदी एकटे गेले— धो धो पाऊस पडत असताना गेले— एका पिंपळाच्या झाडाखाली राहिले. पुढे मग कस्तुरबा गेल्या, महादेवभाई गेले, मीराबेन गेल्या— आणि किती तरी आश्रमीय कार्यकर्ते तेथे गोळा झाले. त्यांच्यासाठी झोपड्या बांधण्यात आल्या—बांबू व माती यांनी बनविलेल्या—जणु ऋषीमुनींच्या पर्णशालाच. कामट्यांच्या भिंतीवर पांढऱ्या मातीचा गिलावा—अशी गांधीजींची झोपडी मी जेव्हा पाहिली, तेव्हा माझ्या मनापुढे वसिष्ठ-वाल्मिकी, याज्ञवल्क्य अशा तपोधनांच्या मूर्ती उभ्या राहिल्या.

हिंदी शेतकऱ्याच्या खेड्यात, हिंदी शेतकऱ्याच्या झोपडीत, हिंदी शेतकऱ्यासारखे जाडेभरडे कपडे वापरून, बॅरिस्टर झालेला व

अनेक स्वातंत्र्य-संग्राम खेळलेला, हा जो हिंदी शेतकरी तेथे वास्तव्य करीत होता, ते काय, ध्यानधारणा व जपजाप्य करण्यासाठी ? तसे करावयाचे असते, तर गांधीजींनी हिमालयाकडे धाव घेतली असती. पण त्यांना मानव-सेवेतून ईश्वर-सेवा साधावयाची होती – मानवामधील ईश्वर पहावयाचा होता – दरिद्र-नारायणाला तोषवून लक्ष्मी-नारायणाला प्रसन्न करून घ्यावयाचे होते. म्हणून त्यांनी आपल्या विधायक कार्याचे अठरा कारखाने तेथे चालू केले. त्यातील एक कार्य म्हणजे गो-सेवा. गो-रक्षणातील उपकारकर्त्याची भावना-मानवी अहंकाराची भावना, यात नाही. दिलीप राजाप्रमाणे गो-सेवा करण्याची नम्रतेची भावना गांधीजींची होती – आणि तीच उतरली जमनालालजींच्या आणि विनोबाजींच्या अंत:करणात.

जमनालालजींनी १९४१ साली सेवाग्राम येथे गो-सेवा-संमेलन भरविले होते. त्याला हजर रहाण्यासाठी मी ता. ११ फेब्रुवारी रोजी तेथे गेलो. तेथे सारे वातावरण शांत – प्रसन्न दिसले. पण तरी विविध कार्यांनी ते गजबजले होते. तेथे जाताच मी गांधीजींच्या पर्णकुटीत गेलो. त्या लहानशा झोपडीत गांधीजी बसलेले होते. समोर चटई टाकलेली होती. तिच्यावर एकदोन माणसे बसलेली होती. मी त्यांना वंदन केले आणि स्तब्ध बसलो. एका भिंतीवर ॐ हे अक्षर मातीने काढलेले होते, आणि एका फळीवर "हे राम" ही अक्षरे लाल कावेने लिहिलेली होती. साधेपणाची सीमा तेथे दिसत होती. पण एखाद्या राजवाड्यात दृष्टीस पडणार नाही, असे प्रसन्नतेचे सरोवर तेथे तुडुंब भरलेले होते. गांधीजी कोणाशी बोलत होते, कोणाशी हसत होते, तर कोणाच्या पाठीवर थाप मारीत होते, सारा आनंदीआनंद भरलेला !

"राष्ट्रजनक टिळक" हे माझे पुस्तक त्या वेळी नुकतेच प्रसिद्ध झाले होते. त्याचाच नैवद्य मी महात्माजींना दाखविला. त्यांनीही कुतूहलाने पुस्तक हातात घेतले, काही पाने चाळली, आणि गोड हास्य केले. माझ्या साऱ्या श्रमांचे चीज झाले, असे मला वाटले. लाख वाचक मिळाल्याचा आनंद मला झाला.

दुसरे दिवशी गो-सेवा-संमेलन सुरू झाले. अध्यक्ष विनोबाजी

होते. त्यानंतर दुसरी एक बैठक भरली. तीत गांधीजी व जमनालालजी या 'पितापुत्रांचा' जो हास्यविनोदयुक्त संवाद झाला, तो काही विलक्षणच. "बापूजी, आता आपण आपल्या "हरिजनात" गो–सेवेसंबंधी झोड उठविली पाहिजे." जमनालालजींनी सूचना केली. ती ऐकून गांधीजी खो खो हसू लागले, आणि म्हणाले, "छान छान, मी किती वेळा काय लिहावे, हेदेखील तुम्ही मला शिकविणार काय ? मी मुरलेला संपादक आहे, असा माझा दावा आहे."

सारी सभा हास्यरसात बुडून गेली.

★

यानंतर तीन वर्षांनीच तिसरी मुलाखत मला मिळाली. तिचे निमित्त म्हणजे, त्या वेळी मी गांधीजींचे एक सविस्तर चरित्र लिहा-वयास घेतले होते. त्यापूर्वी २५ वर्षे तरी, मी त्यांच्या कार्याचे अवलोकन व विचारांचा अभ्यास करीत होतो. पण खास चरित्रलेखनासाठी म्हणून सतत दोन वर्षे मी गांधीजींचे व त्यांच्यावरचे ग्रंथ खूपच अभ्यासिले. पण तेवढयाने माझी तृप्ती होईना. चरित्र–नायकाचा प्रत्यक्ष सहवास लाभला, तो चालतो कसा– बोलतो कसा, हे आपण साक्षात् अनुभविले, तर त्याच्या चरित्र–ग्रंथात जीवंतपणा येतो, असा माझा अनुभव. म्हणून मी गांधीजींच्या मुलाखतीसाठी आसुसलेला होतो. सुदैवाने हरिभाऊ फाटक या कामी मला मदत करण्यास सिद्ध होते. त्यांचेपाशी मी ही गोष्ट काढताच, त्यांनी आनंदाने संमती दिली आणि ता. २८ जून १९४४ ही तारीख निश्चित केली. त्या दिवशी गांधीजींनी हरिभाऊंना मुलाखतीसाठी अर्धा तास दिला होता. त्यातील ५ मिनिटे मी मागितली, पण प्रत्यक्ष मुलाखत झाली ५५ मिनिटे !

त्या दिवशी दुपारी ४ वाजता, पुणे येथील डॉ. दिनशा मेहता यांच्या "निसर्गोपचार–गृहात", मी हरिभाऊंबरोबर गेलो. आजारीपणामुळे गांधीजींची "आगाखान वाड्यातून" नुकतीच मुक्तता झाली होती. ते तेथे निसर्गोपचार घेत होते. त्यासाठी एका साध्या लहानशा खोलीत त्यांची व्यवस्था केली होती. त्या खोलीत जाताच, मी गांधीजींना अभिवादन केले. ते एका डेस्कजवळ बसले होते. त्यावर गीतेचे पुस्तक दिसत होते. जवळच जमिनीवर मुंबईचा "टाइम्स" व

"मुंबई समाचार" यांचे ताजे अंक पडलेले होते. विजेचा दिवा व विजेचा पंखा सेवेस सिद्ध होता. गांधीजींनी हसत हसत सर्वांचे स्वागत केले. हरिभाऊ उभे राहून, प्रेमाने, भक्तीने, कुतूहलाने, गांधीजींच्या मुद्रेकडे पाहत होते. त्यांनी गांधीजींना माझा परिचय करून दिला. तेव्हा गांधीजींनी माझ्या मुद्रेकडे निरखून पाहिले व हलक्या आवाजात, एकेक शब्द सावकाश उच्चारीत ते गंभीरपणे म्हणाले, " आप मेरे यादमें है.

मी आश्चर्यात पार बुडालो. तीन वर्षांपूर्वी मी गांधीजींना भेटलो होतो, त्या घटनेनंतर त्यांच्या मनाच्या काचेवर कितीतरी प्रसंगांची, व्यक्तींची चित्रे उमटली असतील ! त्या हिमालयाखाली माझ्या मुलाखतीची मुंगी केव्हाच चिरडून गेली असावी, असे मी सहजच मानीत होतो. पण मोठ्यांचे मोठेपण लहानसहान गोष्टीतही दिसून येते म्हणतात, ते असे. वरे, माझी आठवण नसताना, केवळ शिष्टाचारासाठी, मला गोड वाटावे म्हणून, गांधीजी खोटे बोलले असतील, हे अशक्य. " तुमची मला आठवण आहे " हे त्यांचे शब्द माझ्या कानी पडताच माझ्या अंगावर आनंदाचे रोमांच उभे राहिले. माझ्यासारख्या अकिंचित्कर माणसाला या महापुरुषाच्या मानस-सरोवरात स्थान असावे-याचा मला मोठा विस्मय वाटला---आणि अभिमान पण वाटला.

सुमारे तासभर चाललेल्या त्या मुलाखतीत मी गांधीजींना माझ्या मनात आले ते सारे प्रश्न, मोकळेपणाने व निःसंकोचपणाने, विचारले. त्यांनीही त्यांची उत्तरे तितक्याच मनमोकळेपणाने दिली. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर जणु काही आधीच त्यांच्या मनात ठरलेले होते. प्रश्न ऐकताच ते उत्तर देत होते, पण अत्यंत जवाबदारीने. एकेक शब्द तोलून---जोखून ते बोलत होते. त्या मुलाखतीचा सारांश 'चित्रमय जगत्'च्या नोव्हेंबर १९४४ च्या अंकात प्रसिद्ध झाला. तो, गांधीजींचे चिटणीस प्यारेलाल यांनी तपासून, दुरूस्त करून दिला होता. गांधीजींचे वहिश्चर प्राण असणारे महादेवभाई त्या वेळी कोठे होते ? १९४२ साली " आगाखान वाड्यात " त्या थोर देशभक्ताने देह ठेवला होता. थेट गांधीजींसारखी भाषा लिहावी महादेवभाईनीच. खरा मानसपुत्र होता तो त्यांचा. त्यांची जागा घेतली प्यारेलालांनी.

त्यांनी, माझ्या मुलाखतीचा मी इंग्रजीत लिहून पाठविलेला सारांश, तपासून मजकडे परत पाठविला. त्या मुलाखतीचा 'चित्रमय जगत्‌मध्ये' प्रसिद्ध झालेला सारांश असा–

**प्रश्न**– "आपणाला जर त्रास होत नसेल तर मी काही प्रश्न विचारू इच्छितो."

**उत्तर**–"मी आनंदाने तुमच्या प्रश्नांची उत्तरे देईन." गांधीजी म्हणाले, "कारण, तुम्हांला जर माझे म्हणणे यथार्थपणे कळले, तर तुम्ही माझा संदेश ग्रंथरूपाने प्रसृत कराल-आणि माझ्या संदेशाचा प्रसार हेच माझ्या जीविताचे उद्दिष्ट कार्य आहे."

**प्रश्न** :–गेल्या पंचवीस वर्षांतील आपल्या अहिंसात्मक चळवळीमुळे ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या अंत:करणात, काही दिसण्यासारखा बदल झाला आहे का ? आणि जर काही थोडाबहुत बदल झाला असेल, तर तो आपल्या सत्याग्रहामुळे, जागतिक परिस्थितीच्या प्रभावामुळे की ब्रिटनच्या अंतर्गत अडचणीमुळे झाला तुम्हांस वाटते ?"

**उत्तर** –"येथे जे प्रत्यक्ष राज्यकर्ते आहेत, त्यांच्यात बदल झालेला मला दिसतो–पण तो बदल प्रतिकूल आहे. गेल्या चळवळीच्या वेळी त्यांची डोकी इतकी फिरली होती की, यापूर्वी ती तशी कधीच फिरली नव्हती. ब्रिटिश जनता आणि जगातील इतर लोक यांच्या बाबतीत सामान्यत: मला अनुकूल बदल झालेला दिसतो–आणि तो सत्याग्रहाचा परिणाम आहे असे मला वाटते. एकाच वेळी अनेक गोष्टी घडत असतात व जगातील लोकमत बनविण्याच्या कामी कोणती गोष्ट किती प्रमाणात उपयोगी पडली, हे सांगता येणे कठीण आहे. हिंदुस्थानात सध्या जे सरकारी धोरण चालू आहे, त्यामुळे इंग्लंडातले काही राज्यकर्ते-सुद्धा मनातून विटून गेले आहेत, असे मी ऐकतो. पण त्याच्यावर मी विश्वास ठेवीत नाही. सत्याग्रहाचे तंत्र अयशस्वी झाले, असे तुम्ही समजू नका. आज ॲमेरी व लिन्‌लिथगो यांची जशी भाषा आहे, तशीच दक्षिण आफ्रिकेत तडजोड होण्यापूर्वी जनरल स्मटस् यांची होती. तेथे सत्याग्रहाची चळवळ दडपून टाकण्यासाठी सरकारने कोणकोणते उपाय योजण्याचे ठरविले, यासंबंधी निरनिराळे प्रवाद ऐकू येत होते. पण अचानकपणे सन्मान्य तडजोड घडून आली. त्याचप्रमाणे येथेदेखील,



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम ... दि ... .....
क्रमांक.. ... .. .. ... नोंद दि ...........

लोकांची डोकी संपूर्ण फिरली नाहीत तर, तडजोड घडून आलीच पाहिजे. आमचा अहिंसात्मक लढा उत्तम प्रकारे चालू राहिला, तर ब्रिटिश राज्यकर्त्यांची अंतःकरणे विरघळलीच पाहिजेत. बोअर युद्ध पूर्ण हिंसात्मक असतानाही त्या लढ्याच्या शेवटी का होईना, पण तडजोड घडून आली, असे तुम्ही म्हणाल. पण त्यासाठी त्यांना काय किंमत द्यावी लागली, याची तुम्हांला कल्पना येणार नाही. त्यांनी फार मोठा त्याग केला होता. त्यांनी जो त्याग केला त्याच्या काही अंशांनी आपण जर त्याग केला असता, तर आमचा अहिंसात्मक लढा फार पूर्वीच यशस्वी झाला असता.''

**प्रश्न** –म्हणजे या अहिंसात्मक सत्याग्रहामुळेच आपण स्वातंत्र्याचे ध्येय साध्य करू, असे आपल्याला वाटते तर !''

**उत्तर**–" अर्थात्. त्यावद्दल संशयाला यत्किंचितही जागा नाही. स्वातंत्र्य वेगाने धावत येत आहे हे मला दिसत आहे, आणि तेसुद्धा दूरच्या भविष्यकाळात नाही--तर आपल्या डोळ्यासमोर. सध्या काळोख दिसत असला, तरी तो पहाटेपूर्वीचा काळोख आहे.

**प्रश्न** –" मला असे वाटते की, उपवास व प्रार्थना यासारख्या आध्यात्मिक गोष्टींचा हिंदी जनतेच्या मनावर अत्यंत परिणाम होत असला तरी ब्रिटिश जनतेवर जर खराखुरा कशाचा परिणाम होत असेल तर तो त्रिविध वहिष्कारांचाच होणार. त्यांच्या खिशाला चिमटा घेतला म्हणजे साम्राज्य–मदाने आधीच कठीण होऊन वसलेल्या त्यांच्या काळजाला चिमटा वसेल. माझे हे म्हणणे आपल्याला पटते काय ? ''

**उत्तर**–" तसेही असू शकेल. तरीसुद्धा वहिष्कार हा सत्याग्रहाचाच एक भाग आहे. प्रतिपक्ष्याचे कधीही नुकसान होऊ देता कामा नये, असा काही अहिंसेचा अर्थ नाही. जर माझ्या मुलाने चोरी केली तर, चोरीचा माल मालकाला परत मिळावा, अशा रीतीने मी वागले पाहिजे. माझ्या कृत्यामुळे माझ्या मुलांवर उपासमारीचा प्रसंग आला, तर तो त्याचा दोष आहे. ब्रिटिशांना हेच तत्त्व लागू आहे.

" जरी त्रिविध वहिष्कार परिणामकारक असला, तरी उपवास व प्रार्थना परिणामकारक नाहीत, हे मी मुळीच मान्य करणार नाही. शत्रूला आपलासा करण्यासाठी किती लोक प्रार्थना करीत असतील याची

मला शंका आहे. मला वाटते की, मी एकटाच एक अपवाद असेन. माझ्यात जरूर ती उत्कटता असेल, तर तिचासुद्धा उपयोग होईल. माझ्या अंगी ती पुरेशी नसावी, असा मला संशय आहे. जरी त्याचे मला प्रत्यक्ष प्रमाण दाखविता येणार नाही, तरी प्रार्थनेच्या परिणामकारकतेवर माझी निष्ठा अढळ आहे. ''

**प्रश्न**–" मी आता दुसऱ्या मुद्द्याकडे वळतो. जिना व मुस्लिम लीग यांना जिकण्यासाठी आपण जिवाचे रान केले आहे, पण सावरकर व हिंदुसभा यांना आपलेसे करण्यासाठी आपण जर त्याच्या दशांश परिश्रम केले असते तर, त्यायोगे आपले सामर्थ्य वाढले असते, निदान आपला एक विरोधक तरी कमी झाला असता. ''

**उत्तर**–"हिंदुमहासभा जिंकून घेण्याची मला जरूरी वाटत नाही. कारण बहुजनसमाज माझ्याच बाजूला आहे. केळकर व सावरकर यांच्यासारखे लोक जिकण्यासाठी मी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे, हे तुम्ही लक्षात ठेवा. इतर कोणाहीसाठी मी इतका भगीरथ प्रयत्न केला असेल असे मला वाटत नाही.पण 'जिंकून घेणे' हा शब्द काही बरोबर नाही. सावरकरांची देशभक्ती व निर्भयता या गुणांचा मी चाहता आहे व त्यांनी भोगलेले कष्ट हा आमचा समान धर्म आहे. पण आमचे मार्ग दोन ध्रुवाइतके भिन्न आहेत. अहिंसेच्या प्रश्नाबाबत सावरकर माझे तीव्र विरोधी आहेत. त्यांनी अशी एकही सभा सोडली नाही की तिच्यात त्यांनी माझा निषेध केला नाही. ''

**प्रश्न**–''पण अहिंसेचा एक प्रश्न सोडून दिला तर स्वातंत्र्य, पाकिस्तान यासारखे दुसरे अनेक विषय असे आहेत की,ज्याबद्दल आपणा दोघांचे एकमत होऊ शकेल. मी असे ऐकतो की, सावरकरांना ऑगस्ट–ठराव पसंत होता आणि आपण जर त्यांना ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीला बोलावून त्यांचा सल्ला घेतला असता, तर त्यांनी कदाचित् आपल्याला पाठिंबा दिला असता. ''

**उत्तर**– "पण मी हे करू शकलो नसतो, हे तुमच्या लक्षात यावयास पाहिजे. जीनांचीसुद्धा तीच तक्रार आहे. इतकेच नव्हे तर, ज्या अर्थी त्यांचा सल्ला घेण्यात आला नाही, त्या अर्थी ऑगस्ट–ठराव हे ब्रिटिशांप्रमाणेच मुसलमानांनाही एक प्रकारचे आव्हान आहे, असे ते

म्हणतात. अशा स्थितीत मी काय करणार ? ज्यांचा माझ्या पद्धतीवर विश्वास नाही, अशांना मला कसे बोलावता आले असते ?

"सावरकरांच्या मुक्ततेसाठी मी काय केले आहे, याची लोकांना माहिती नाही. मी ज्या कारणासाठी त्यांच्या सुटकेच्या अर्जावर सही करण्याचे नाकारले, ती कारणे उघड आहेत. पण त्यांच्या मुक्ततेत माझा महत्त्वाचा भाग आहे. हे मीच आपल्या तोंडाने सांगावयाची जरूरी नाही. सरकारी दप्तरात त्याची स्पष्ट नोंद आहे.''

माझी मुलाखत लांवत चालली, असे पाहून प्यारेलालांनी गांधीजींना घड्याळ दाखविले. मी चपापलो, आणि गांधीजींना म्हणालो, "हरिभाऊंना आपण दिलेल्या वेळेवर मी अतिक्रमण केले, आता मी आपला निरोप घेतो. या चरित्राची प्रत मी आपल्याला पाठवीन, पण कोठे, हे सांगता येत नाही.''

गांधीजींनी हसत हसत उत्तर दिले, "तुम्हांला आणखी काही माहिती पाहिजे असेल, तर मला लिहा.''

पुढे एक-दोन मुद्द्यांच्या स्पष्टीकरणार्थ मी त्यांना लिहिले, पण पांचगणीहून प्यारेलालांचे उत्तर आले, "सध्या कामाच्या भाराखाली महात्माजी दडपले गेले आहेत, अशा वेळी त्यांना आपल्या पत्राचे उत्तर लिहावयास लावणे, हे क्रौर्याचे होईल.''

महात्माजींच्या या तीन मुलाखती म्हणजे माझ्या जीवनातील तीन तीर्थस्थाने होत.



डॉ. राजेंद्रप्रसाद

२

# राजर्षी राजेंद्रप्रसाद

लोखंडाचे लोणी बनविण्याची जादू स्वातंत्र्यात आहे, याची जाणीव मला राजधानीत विशेषच झाली. प्रवासात आगगाडीतील रेल्वे-अधिकाऱ्यांचे आदबीचे वर्तन हा स्वातंत्र्याचा एक परिणाम नव्हे काय ? सर्व सरकारी कचेऱ्यांची दारे आम जनतेला खुली झाली व उच्च अधिकारीही त्या जनतेचे सादर स्वागत करू लागले, ही मनःक्रांती स्वातंत्र्याचेच फल नव्हे काय ? राजधानी दिल्लीत तर, राज्यलक्ष्मी ही आता पारतंत्र्यातील नररुंडधारी कालिमाता राहिलेली नसून, वरदायिनी महालक्ष्मीप्रमाणे प्रसन्न अशीच मला दिसली.

पूर्वी ' व्हाइसरीगल लॉज ' म्हणजे एक भयप्रद वास्तु होती–गोऱ्या ' मोगल बादशहा 'चा जणु किल्लाच होता. त्याचे दुरून दर्शनही सर्वसामान्य नागरिकाला अशक्य असे. तो आता ' राष्ट्रपति–भवन ' झाला आहे. त्यावर राष्ट्रपतीचा स्वतंत्र ध्वज फडकत आहे. त्या भवनापासून सुमारे अर्ध्या मैलाच्या अंतरावर पंतप्रधानांचे निवासस्थान आहे. त्यात पूर्वी सरसेनापती रहात. तेथे तेव्हा कोण फिरकू शकेल ? पण आता दररोज पंडितजींच्या दर्शनासाठी सकाळी कोणीही बाल – वृद्ध, गरीब – अडाणी पण स्वतंत्र भारतीय

सहज जाऊ शकतो, निर्वासित तर काय ? त्या बंगल्यापुढील बागेत केव्हाही तळ देऊन बसलेले आढळत. हक्कच होता तो त्यांचा ! मी गेलो त्याचवेळी एके दिवशी रात्री दहाचे सुमारास कैक निर्वासित पंतप्रधानांच्या. "कोठी"भोवती गराडा देऊन, ओरडा करीत होते. लोकशाहीचा अधिकारच आहे तो !

नवी दिल्ली म्हणजे मुंबई व महाबळेश्वर यांचा सुंदर संगम. साठ वर्षांपूर्वी इंग्रजांनी कोटचवधी रुपये खर्चून बांधलेली ही भव्य नगरी अजून काल बांधल्यासारखी नवीकोरी दिसत आहे. आधुनिक शहरातील सर्व भौतिक सुधारणा आणि गिरिशिखरावरील शांतता व निसर्ग-रमणीयता यांचा मधुर मेळ तेथे दिसतो. पार्लमेंटची लाल दगडी वर्तुळाकार इमारत दरारा उत्पन्न करणारी आहे. रस्ते अत्यंत प्रशस्त व डांबराचे आहेत. त्यांच्या मध्यभागी, चौकाचौकात मोठमोठ्या कारंजातून पाणी उसळत–निथळत आहे. थुईथुई उडणारी छोटी छोटी शेकडो कारंजी प्रत्येक इमारतीचे चोहो अंगांना शोभवीत आहेत. गोल आकाराची, हिरवीगार चिमणी झाडे तर सर्वत्र छत्र्या उभारल्या-प्रमाणे दिसतात. दोन चिमुकले कालवे या शोभेत भर घालतात. त्या कालव्यावर नौका क्रीडत असतात. नव्या दिल्लीत मुख्य वस्ती सरकारी अधिकाऱ्यांचीच. सुमारे ५२००० अधिकाऱ्यांसाठी १९००० शिपाई कचेऱ्या–कचेऱ्यातून राबत असतात–धावपळ करीत असतात.

अर्ध्या मैलाच्या प्रशस्त रस्त्याच्या एका टोकावर पंतप्रधान-निवास, तर दुसऱ्या बाजूस राष्ट्रपति-भवन. त्या दोन्ही निवासस्थानांच्या शिखरावर तिरंगी झेंडे स्वातंत्र्याच्या डौलाने डुलत आहेत. ते झेंडे एकमेकांशी रात्रं-दिवस गुजगोष्टी करीत असतील.कसल्या गोष्टी असतील त्या ?एक झेंडा नम्रतेचा द्योतक तर दुसरा, वीरत्वाचा. एकाच्या सावलीखाली साधुत्व वसत आहे, तर दुसऱ्याच्या तेजामध्ये भारतीय मुत्सद्देगिरी तळपत आहे. राष्ट्रपतिभवनात जितका संयम, तितकाच पंतप्रधान – कोठीत पराक्रम. पहिल्यातील भव्यत्व व प्रचंडत्व छाती दडपून टाकणारे, तर दुसऱ्यातील प्रत्येक वस्तु अद्यावत्. एकीकडे शांतता, सहिष्णुता, लीनता ; तर दुसरीकडे तेज, चैतन्य, धावपळ. एक सज्जनगड तर दुसरा रायगड !

मला पहिला योग मिळाला, तो राष्ट्रपति–भवनात जाण्याचा. दुपारी साडेअकरा वाजता, चौकीपहाऱ्यातून व प्रदीर्घ मार्गाच्या चक्रव्यूहातून, मी गांधीजींच्या पुतळ्याला प्रणाम करीत, राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या भेटीसाठी गेलो. त्या वेळी ते आपल्या बागेत बसले होते. ही 'मोंगल' बाग सुप्रसिद्ध आहे – अत्यंत विस्तीर्ण, अतिशय सुंदर, छोटचा छोटचा डेरेदार झाडांनी सुशोभित दिसणारी.

राजेंद्रबाबूंचीं सत्त्वगंभीर, वयोवृद्ध, प्रशांत मूर्ती खुर्चीवर बसलेली होती. दुसऱ्या खुर्चीवर बसून मी त्यांना 'महात्मा' मासिकाचा अंक व 'आमचे स्वातंत्र्य – लढे' ही पुस्तके अर्पण केली.

"न गच्छेद् रिक्तहस्तेन राजानं देवतां गुरुं" या न्यायाने मी हे 'सुदाम्याचे पोहे' नेले होते. त्यांचा स्वीकार करून राष्ट्रपतींनी, पं. जवाहरलालांविषयी व त्यांच्या राज्यकारभाराविषयी मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मनमोकळेपणी व खुलासेवार दिली. ती देताना त्यांचा प्रांजळपणा शब्दाशब्दातून व्यक्त होत होता.

"मी काय ? सामान्य माणूस. माझी ईश्वरावर श्रद्धा आहे, पण ती दुर्बल आहे – गांधीजींप्रमाणे सामर्थ्यवान नाही." असे शालीन उद्गार त्या राष्ट्रपतींच्या मुखातून, त्या राष्ट्रपतिभवनातून निघालेले ऐकताना, माझे मन म्हणाले, "आहेत, गांधीवादाचे वारस अजून या देशात आहेत." राज्यसत्तेचे पूर्वीचे वैभव तेथे नांदत असले, तरी त्या सत्तेचा मद व उग्रपणा मात्र तेथे उरलेला नाही. ही स्वातंत्र्याची किमया ! भारताच्या राजधानीवर राजघाटाची पावन छाया पडलेली दिसते. त्या छायेत आमची प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे झाली :–

**प्रश्न**–पंडित जवाहरलालांशी आपला संबंध केव्हा, कसा आला?

**उत्तर**–त्यांचा माझा परिचय १९२१ सालापासून आहे. पुढे तो दृढ झाला, बिहारमधील भूकंपाचे वेळी. १९३४ साली आमच्या प्रांतावर तो अनर्थ ओढवला. त्या वेळी जवाहरलाल आमच्या मदतीस धावून आले. हातात कुदळ-फावडे घेऊन प्रत्यक्ष कामास लागले, पूर-ग्रस्तांना मदत करण्याची यंत्रणा व्यवस्थित करू लागले, कार्यक्षम करू लागले. परंतु थोडयाच दिवसात ब्रिटिश सरकारने त्यांना पकडले व

तुरुंगात टाकले. तेवढ्यात त्यांची उद्योगशीलता, कार्यकौशल्य, चलाखी वगैरे किती तरी गुण माझ्या दृष्टीस पडले. पुढे सहकारी म्हणून काँग्रेसच्या ध्वजाखाली आम्ही किती तरी वर्षे एकत्र काम केले.

**प्रश्न**–आता भारत स्वतंत्र झाला. त्यात ते बनले पंतप्रधान व आपण राष्ट्रपती. तेव्हा या नव्या सरकारी नात्यावरून आपले संबंध कसे राहिले आहेत ?

**उत्तर**–प्रत्येक आठवड्यास दर सोमवारी माझी भेट घेण्याचा पायंडाच जवाहरलालांनी पाडला आहे. त्या वेळी देशातील व जगातील घडामोडींवर आम्ही दोघे मनमोकळेपणाने बोलतो. महिन्यातील पहिल्या आठवड्यात मात्र मंगळवारी जवाहरलाल मला भेटतात.

**प्रश्न**–आपण ग्रंथकार आहात आणि जवाहरलालही ग्रंथकार आहेत. तेव्हा जवाहरलालांच्या ग्रंथसंपत्तीबद्दल आपले मत काय आहे?

**उत्तर**– जवाहरलालांचे ग्रंथ जगात मोठी मान्यता पावलेले आहेत. महाविद्यालयातील एखाद्या प्राध्यापकाप्रमाणे, आपल्या अभ्यासिकेत निवांत बसून, हाताशी आधारभूत ग्रंथ ठेवून, त्यातील उतारे टिपून घेऊन, ग्रंथ रचण्याइतके स्वास्थ्य व सोय जवाहरलालांना लाभली नाही. त्यांचे सारे ग्रंथ–लेखन झाले तुरुंगातच. पण त्यांनी आपलय बुद्धि–वैभवाने इतिहासाचे व्यापक समालोचन केले आणि त्यातील घटनांची कार्यकारण–मीमांसाही केली.

**प्रश्न**–आपल्या राजकारणाच्या दैनंदिन व्यवहारात जवाहरलालांशी कधी मतभेदाचे प्रसंग येतात काय ?

**उत्तर**–हो, कधी कधी येतात. तसे होणे स्वाभाविकच आहे, पण आमचे मतभेद कधी विकोपास जात नाहीत–पेचप्रसंग निर्माण करीत नाहीत. प्रत्येकाचे मत ऐकून घेण्यासाठी जवाहरलाल आपले मन सदैव उघडे ठेवीत असतात. त्यांचे माझे वाद-संवाद नेहमीच मधुर वातावरणात होतात.

**प्रश्न**–स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर–अशा दोन कालात आपल्या राष्ट्रात कोणता फरक पडला आहे ?

उत्तर–मला वाटते, स्वातंत्र्यापूर्वी आम्ही सर्वजण सर्व राष्ट्राच्या कल्याणासाठी झटत होतो, पण स्वातंत्र्यानंतर जो तो आपले स्वतःचे

हित साधण्याच्याच मागे लागलेला दिसतो.

**प्रश्न**–आपल्या राष्ट्राचा नैतिक अध:पात होत आहे, असे आपल्याला वाटते काय ? व्यापारी वर्गाचा काळाबाजार, अधिकारीवर्गाचा लाचखाऊपणा इत्यादी नीतिभ्रष्टता पूर्वीपेक्षा आता वाढली आहे काय ?

**उत्तर**–दुसऱ्या महायुद्धाचा तो एक पश्चात–परिणाम आहे. सर्व जगभर तो दिसून येत आहे. युद्धकालीन नियंत्रणामुळे काळाबाजार व लाचलुचपत यांना अधिक वाव मिळाला. हा नैतिक अध:पात म्हणजे मानवाची सर्वात मोठी हानी. ती टाळण्यासाठीच आम्ही धान्यावरील नियंत्रणे उठविण्याच्या मार्गास लागलो होतो. तेव्हा मी अन्नमंत्री होतो. गांधीजींचा त्या धोरणास पूर्ण पाठिंबा होता. पण अर्थशास्त्रज्ञांनी आम्हाला भीती घातली. नियंत्रणे उठली की लोकांची उपासमार होईल, असे त्यांनी आकडयांनी दाखविले. तेव्हा नियंत्रणे पुन्हा बसवावी लागली.

**प्रश्न** –स्वातंत्र्यानंतर त्यागापेक्षा स्वार्थाकडे भारतीयांचे लक्ष अधिक लागले आहे, असे आपल्याला वाटते काय ?

**उत्तर** –सर्वसाधारणपणे तसे म्हणता येईल. प्रत्येकजण झटपट श्रीमंत होऊ पाहतो–कोणत्याही साधनाने श्रीमंत व्हावे, म्हणून ज्याची त्याची धडपड चाललेली दिसते. आमचे कामगारही पगारवाढ मागतात, पण कामांत मात्र चुकारपणा दाखवितात. स्वतंत्र नागरिकांवर कामाची जास्तच जबाबदारी असते. महायुद्धापूर्वीच्या काळातही इंग्लंड वगैरे स्वतंत्र देशातील नागरिक किती उदारपणे, चोखपणे वागत असत. त्यांची सामाजिक नीतिमत्तेची पातळीच उंच आहे. इंग्लंडमधील गिऱ्हाईक दुकानात गेले म्हणजे किंमतीसाठी घासाघीस करीत बसत नाही. सचोटी हा गुण आपल्या राष्ट्रात पुष्कळच वाढीस लागावयास पाहिजे.

**प्रश्न** –आज जर गांधीजी विद्यमान असते, तर राष्ट्रातील नीति–भ्रष्टता थांबली असती काय ?

**उत्तर** –तसे कसे म्हणता येईल ? १९४७ साली स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर, गांधीजी हयात असतानाही, लाचलुचपत बोकाळली होतीच–

आतापेक्षाही अधिक बोकाळली होती. गांधीजींसारख्यांच्या प्रयत्नाने समाजाची नैतिक उंची वाढते, पण हळूहळू.

**प्रश्न** –ही झाली आपल्या समाजाची स्थिती; पण आपले सरकार कसे चालले आहे ? गांधीजींच्याच मार्गाने काँग्रेस सरकारे काम करीत आहेत काय ?

**उत्तर** –तसे मी म्हणू शकत नाही. गांधीजींची नीती व आमच्या सरकारची नीती ही सोळा आणे सारखीच आहे, असे नाही. गांधीजी जो कार्यक्रम राष्ट्रापुढे ठेवीत होते,तो केंद्रीय सरकार किंवा कोणतेही राज्य-सरकार, पूर्णपणे अंमलात आणीत नाही. पण त्यांतील कोणता ना कोणता कार्यक्रम पार पाडण्याचा प्रयत्न सर्व सरकारे करीत आहेत. मात्र गांधीजींच्या डोळ्यापुढे समाजाचे जे चित्र होते, ते आमच्या सरकारपुढे नाही––त्यांचे ध्येय पुढे ठेवून आम्ही चाललेलो नाही.

**प्रश्न**– याचे कारण काय ?

**उत्तर**–पाश्चात्य कल्पना व पौरस्त्य संस्कृती यांचा संघर्ष आपल्या देशात चाललेला आहे. म्हणून कोणत्याच दिशेने आपली झपाट्याने प्रगती होत नाही. गांधीजींची श्रद्धा आमचे अंगी नाही, त्यांची शक्ती आमचे ठायी नाही. गांधीजींच्या साऱ्या कार्याचे मूळ या भूमीत रुज-लेले असे; पण आपल्याला पाश्चात्य विचार ओढीत आहेत, आपला लष्करी खर्च वाढत आहे. आपले आर्थिक धोरण गांधीजींसारखे नाही. परराष्ट्रात आपल्याला प्रतिष्ठा आहे, पण ती आपल्या नीतिमत्तेमुळे नाही, तर भारताचे भौगोलिक स्थान आशिया खंडाच्या मध्यभागी आहे आणि आपले मनुष्यबळ अफाट आहे, म्हणून.

**प्रश्न**– मग काय आमच्या सरकारपुढे इंग्लंड–अमेरिकेचाच आदर्श आहे ? त्यांच्यापेक्षा आमच्या सरकारचा भर शांततेवर, सहकार्यावर, समतेवर व नीतिमत्तेवर अधिक नाही काय ?

**उत्तर**– असे मी कसे म्हणेन ? पण सांप्रत काळी सर्व जगापुढे जो आदर्श आहे, त्यातच थोडाफार फेरफार करून, आम्ही वाटचाल करीत आहो. त्यामध्ये आमूलाग्र परिवर्तन आम्ही करू इच्छित नाही. दुसऱ्या देशात जी समाज–रचना आहे, ती आपण येथे निर्माण करावी एवढीच आमची इच्छा आहे. त्यामध्ये आम्ही भारताचे काही वैशिष्ट्य

राखू इच्छितो हे ठीक आहे; पण गांधीजींच्या कल्पनेतील समाज-चित्र आमच्यापुढे नाही, हे मात्र खरे.

**प्रश्न** –मग जगातून द्वेषाचे, हिंसेचे, युद्धाचे उच्चाटन कसे होणार ? आणि शांतता व समृद्धी पृथ्वीतलावर कशी अवतरणार ?

**उत्तर**– त्याला माझ्या मते गांधीवादाविना अन्य मार्ग नाही. माझे स्पष्ट व निश्चित मत असे आहे की, भोगापेक्षा त्यागांत, द्वेषापेक्षा प्रेमात, भयापेक्षा विश्वासात, अधिकारापेक्षा कर्तव्यात आणि शोषणापेक्षा सेवेत जेव्हा सर्व माणसे गोडी घेऊ लागतील, तेव्हाच जागतिक शांतता प्रस्थापित होईल आणि मानवजात सुखी होईल. गांधीजींचा शांतिसंदेश, त्यांचा अहिंसा–मंत्र तो हाच. तोच जगाचा तारक आहे, उद्धारक आहे.

**प्रश्न** – समाजवादाचेही ध्येय हेच नाही काय ?

**उत्तर**– आहे, हेच ध्येय समाजवादाचेही आहे. गांधीवाद व समाजवाद यांच्या ध्येयात बहुतांश समानता आहे; पण साधनामध्ये मूलभूत फरक आहे.

**प्रश्न**– तो फरक कोणता ?

**उत्तर**– समाजवाद हा व्यक्तीच्या सुधारणेला स्वतंत्र महत्त्व देत नाही. परिस्थिती सुधारली की व्यक्ती सुधारते–आणि मग जगही सुधारेल अशी त्यांची विचार-धारा आहे. पण जगाचा इतिहास असे सांगतो की, समाजाची उन्नती होण्यासाठी आधी व्यक्तीची उन्नती होणे अवश्य आहे.

**प्रश्न**– शिवाय गांधीवादातील अहिंसाही समाजवादाला मान्य नाही, होय ना ?

**उत्तर**– खरे आहे; पण याचा अर्थ असा नव्हे की, समाज-वादाला हिंसाच हवी आहे. समाजांतील वर्ग-संघर्षाचा अंत करून जगात शांतता व अहिंसा स्थापन करावी, असाच समाजवादाचाही हेतू आहे. म्हणून प्रारंभी हिंसक साधने वापरली, तरी समाजवाद ती वर्ज्य मानीत नाही; पण गांधीवाद अहिंसेच्याच साधनाने सर्वोदय करू इच्छितो.

**प्रश्न**– याचा अर्थ असा आहे का की, समाजवाद परिस्थिती सुधारण्यावर भर देतो, तर गांधीवाद मन:स्थिती सुधारण्याचा आग्रह धरतो ?

**उत्तर**– गांधीवाद मन:स्थितीबरोबरच परिस्थितीचाही विचार करतो. बाह्य परिस्थिती बदलण्यासाठी, पारतंत्र्य नष्ट करण्यासाठी तर, गांधीजींनी भारतात सत्याग्रहाची आंदोलनामागून आंदोलने केली नाहीत का ? गांधीवादात बाह्य वस्तूंची उपेक्षा नाही, पण माणसामाणसांच्या आणि राष्ट्राराष्ट्रांच्या इच्छांचा जेव्हा संघर्ष होतो, तेव्हाच युद्ध उत्पन्न होते. त्यामुळे शोषण व शोषक-वर्ग जन्मास येतो.


**प्रश्न**– असा इच्छांचा संघर्ष होऊ नये व युद्धातील हिंसाही होऊ नये, म्हणूनच ना समाजवाद संपत्तीची समान वाटणी करा म्हणतो ?

**उत्तर**– समाजवाद सांगतो, अमीरांची संपत्ती हिरावून घ्या व ती सर्वांना समान वाटून द्या. यामुळे एका अमीराचा नाश होईल, पण अधिक धन मिळविण्याची लालसाच नवे नवे अमीर उत्पन्न करते, द्वेष व हिंसा निर्माण करते.

**प्रश्न**– ही लालसाच नष्ट करण्यावर गांधीजींचा कटाक्ष आहे काय ?

**उत्तर** – अर्थात् ! गांधीवाद सांगतो की, अमीराची संपत्ती हिरावून घेण्याची आम्हांला गरज नाही. कारण तसे केल्याने प्रतिहिंसा निर्माण होईल आणि धनाला भलतेच महत्त्व प्राप्त होईल. म्हणून अमीराच्या हृदयाचे परिवर्तन युक्तीने व प्रेमाने करावे आणि त्याला स्वेच्छेने सर्वांच्या पातळीवर आणावे, हे धोरण गांधीवादाचे आहे. गांधीवाद सेवा व त्याग त्यांना महत्त्व देऊन बाह्य स्थिती सुधारू पाहतो.

ही मुलाखत तारीख १९ डिसेंबर १९५३ रोजी झाली.



पं. जवाहरलाल नेहरू

३

# पं. नेहरूंचे विचार–धन

माझ्या आयुष्यात भाग्याचे जे थोडेफार दिवस आले; त्यांपैकी एक म्हणजे ता. २३ डिसेंबर १९५३ ! हिमालयाच्या सरगमाथ्याला स्पर्श करताना तेनसिंगला आपल्या साहसाच्या साफल्याचा जो आनंद वाटला, तो त्या दिवशी मी अनुभविला. कारण माझ्या दृष्टीने जवाहरलाल म्हणजे कर्तृत्वाचे व चैतन्याचे हिमालयच होते. त्या मानवी हिमालयाचे मोजमाप घेण्याचे धाडस मी केले होते. त्यासाठी राजधानी दिल्ली येथे मी पंधरा दिवस ठाण देऊन बसलो होतो–आणि राष्ट्रपतीप्रभृतींच्या मुलाखतीसाठी खटपट करीत होतो. खुद्द पंडितजींनी ता. २३ रोजी दुपारी साडेचार ते पाचपर्यंतची वेळ मला आपल्या मुलाखतीसाठी दिली होती. एखाद्या भोजराजाने आपल्या कंठातील रत्नमाला कवीला काढून द्यावी; तशी मला पंडितजींची ती उदारता वाटली.

बरोबर साडेचार वाजता, त्या भव्य सचिवालयातील एका प्रशस्त कार्यालयांत, मला पंडितजींच्या चिटणीसाने नेऊन सोडले. दाराशी मी उभा राहिलो, तेव्हा एका क्षणात, माझ्या चित्तापुढून पंडितजींच्या चरित्राचा सारा चित्रपट भर्रकन सरकला. “ ते केवढे सत्ताधीश ! इंग्रजी भाषेवर त्यांचे केवढे प्रभुत्व ! साऱ्या देशाचा

भार त्यांच्या मस्तकावर ! त्यांच्यापुढे आपण म्हणजे 'समुद्रपल्वला'-सारखे. सर्वच बाबतीत अंतर ! त्यांची मुलाखत घेणे आपल्याला कसे काय जमणार ? ते आपल्याला हसणार तर नाहीत ? रागावणार तर नाहीत ?'' अशी धाकधूक अंत:करणात चालली असतानाच, "आई ये ऽऽऽ'' अशी हास्यमुद्रेतून ओसंडणारी व प्रेमभावाने ओथंबलेली हाक माझ्या कानी आली– आणि माझी सारी भीती पार पळाली. अर्धवट उघडलेल्या दारात, मी पहिले पाऊल टाकले ते धीटपणाने-सलगीने–हसतमुखाने !

प्रथम मी त्यांना मी लिहिलेल्या 'गांधी–चरित्राची' प्रत नम्रपणे सादर केली– आणि नंतर त्यांना दाखविले इंग्लंडमधले एक पत्र. केंब्रिज विद्यापीठात पंडितजी शिकत होते, म्हणून तेथील चालकांना मी एक पत्र पाठविले होते आणि पंडितजींच्या विद्यार्थी–दशेतील आठवणी मागविल्या होत्या. त्या चालकांचे केंब्रिजहून आलेले पत्र मी पंडितजींच्या हाती दिले. ते पाहताच त्यांची चर्या खुलली. आपला जुना फोटोच पहात असल्याप्रमाणे, ते पत्र हसऱ्या डोळ्यांनी वाचू लागले. त्यांच्या तारुण्यातील साऱ्या स्मृती जागृत झाल्या असाव्यात. त्या पत्राच्या 'मंतरलेल्या सतरंजी'वरून त्यांच्या मनाने चाळीस वर्षे मागे प्रवास केला, आणि आपल्या विद्यार्थी–दशेतील रम्य अनुभवांचा पुन:प्रत्यय घेतला. नंतर आमची मुलाखत इंग्रजीत झाली.

ह्या मुलाखतीत झालेली महत्त्वाची प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे,--

**प्रश्न**– आपण दररोज गीता वाचता, किंवहुना उशाशी घेऊन, निजता, असे म्हणतात ते खरे आहे काय ?

**उत्तर**– तसा काही माझा नेम नाही. पण हे खरे की, अगदी लहानपणापासून मी गीता नेहमी वाचीत आलो आहे आणि त्यामुळे माझ्या चित्ताला स्थैर्य व समाधान लाभले आहे. पंधराव्या वर्षी मी इंग्लंडला शिक्षणासाठी गेलो, त्याचे आधीपासूनच माझे लक्ष गीतेकडे वळलेले होते. संस्कृत वाङ्मयाची ओळख त्यावेळी मला थोडीबहुत झालेली होती. पुढे अलाहाबाद विद्यापीठाचे कुलगुरू झालेले गंगनाथ झा हे त्यावेळी प्रोफेसर होते. ते मला पंचतंत्र, हितोपदेश, रघुवंश शिकविण्यासाठी घरी येत. डॉ. भांडारकरांच्या पुस्तकावरून मी तेव्हा

संस्कृत शिकत होतो. पुढे असहकारितेच्या काळांत मी गीता पुनः पुनः वाचली.

**प्रश्न**– हे जसे मनाचे स्थैर्य आपण कमाविले, तसे शरीराचे सामर्थ्य कसे कमाविले ? आपली उत्साह-शक्ती अजब आहे, तिचे मूळ काय ?

**उत्तर**– माझे शरीर ठीक आहे. मी दररोज नियमाने दहा मिनिटे तरी शीर्षासन, सर्वांगासन इत्यादी योगासने करतो. त्यामुळे शरीर चपळ व तरतरीत रहाते.

**प्रश्न**– योगासनासारख्या पुराण-शास्त्राकडे आपण कसे वळला ?

**उत्तर**– हां ! त्याचे असे झाले. पंचवीस वर्षापूर्वी मी तुरुंगात होतो. तेथे माझे काही मित्र योगासने करीत; त्यांनी मला ही विद्या शिकविली.

**प्र.**–आपल्या मनाची व शरीराची सामर्थ्ये कसोटीस लावण्या-सारखे बिकट प्रसंग गेल्या पाच सात वर्षात अनेक आले. तेव्हां " नको हा जंजाळ ! " असे वाटून, आपल्याला हिमालयात जावे, असे कधी वाटले काय ?

**उ.**–होय, मला असे अनेकदा वाटले. पण स्वाभिमान म्हणून काही आहेच की नाही ? कदाचित् कर्तव्यनिष्ठाही असेल. त्यामुळे माझे पाय जागच्या जागी रोवून मी संकटाशी सामना देण्यास उभा राहू शकलो. अशा संकटकाली जेव्हा मला संशय पडतो, तेव्हा मला विलक्षण मनस्ताप होतो–रात्री झोपसुद्धा लागत नाही. पण एकदा निर्णय केला म्हणजे माझे मन शांत होते–मग मी परिणामाची पर्वा करीत नाही.

**प्र.**– 'आपला अधिकार कर्मावर आहे, फलावर नाही,' ह्या गीते-तील कर्मयोगाचेच हे स्वरूप आहे, असे मी मानतो. आपल्याला खरा आनंद कशापासून होतो ? निवडणुकीचे दौरे व त्यातील भाषणे ह्यापासून ?

**उ.**–छेः, छेः, मला निवडणुकीचे दौरे मुळीच आवडत नाहीत–राज-कीय काथ्याकूट करणे, फायली चाळणे, माझ्या मनास अगदी मानवत नाही. पण मला राज्यकारभारातील प्रचंड उलाढाली करण्याची हौस

आहे. विज्ञानशाळा, धरण-योजना, कारखाने इत्यादी भव्य कार्याची माझ्या मनाला ओढ आहे. त्याचप्रमाणे बहुजनसमाज पाहणे, त्यात मिसळणे, त्याच्याशी बोलणे ह्यापासून मला नवाच उत्साह प्राप्त होतो.

प्र.—आपण वक्तृत्वकलेचा विशेष अभ्यास केला आहे ?

उ.—नाही. माझे पहिले सार्वजनिक भाषण प्रतापगडच्या शेतकऱ्यांपुढे झाले. तेव्हा काय नि आता काय, मी माझ्या मनातील विचार श्रोतृवर्गाला समजावून देत असतो—अगदी शाळेतील शिक्षका-सारखा. हातवारे करणे वगैरे वक्तृत्वाच्या बाह्य अंगाकडे मी लक्ष देत नाही.

प्र.—तरीही गेल्या निवडणुकीत पुणे येथे आपण जे भाषण केले होते, ते एखाद्या भावगीतासारखे रम्य होते—थेट अंतःकरणाला जाऊन भिडणारे होते. आपण आपल्या व्याख्यानांनी व कृतीनी स्वदेशात व जगात, गांधीवादाचा प्रसार, दुसऱ्या कोणत्याही माणसापेक्षा, जास्त केला आहे हे खचित, पण आपला प्रत्यक्ष राज्यकारभार मात्र गांधीवादास धरून चालत नाही, असे म्हणतात, हे खरे का ?

उ.—हा तर वडा प्रश्न आहे. गांधीवादाची बाह्यांगे पाहून चालणार नाही, त्याचा आत्मा ओळखला पाहिजे.

प्र.—तो कोणता ? सत्तेचे व संपत्तीचे विकेंद्रीकरण करून शोषण व हिंसा थांबविणे हाच ना ?

उ.—ते खरे आहे. पण आज ते पूर्णांशाने शक्य नाही. आज आपल्या स्वातंत्र्याचे संरक्षण करणे हाच प्रधान प्रश्न आहे. आपला कारभार लोकशाहीचा आहे. त्याच्याही मर्यादा राज्यकर्त्यांवर पडतात.

प्र.—आपले आत्मचरित्र १९३६ सालापर्यंतच आहे, ते पूर्ण केव्हा करणार ?

उ.—सवड कोठे आहे ?

प्र.—लो. टिळकांची भारतीय राजकारणातील कामगिरी आपण किती मानता ?

उ.—प्रचंड ! त्यांनी आपल्या राष्ट्राची फारच मोठी सेवा केली आहे.

वाहेर आलेल्या लोकांकडून पुढील मुलाखतीच्या सूचना पंडित-


जींना येत होत्या. त्या ध्यानी घऊन मी त्यांचा कृतज्ञतापूर्वक निरोप घेतला. निरोप देताना ते खुर्चीवरून उठून थेट दारापर्यंत आले आणि आपल्या सुहास्याने त्यांनी माझे मन पुनः उजळून टाकले.

खरोखर, जवाहरलालांचा जीवनपट किती विलक्षण विरोधांनी भरलेला आहे ! जन्म श्रीमंत कुळात झालेला, पण सारा जन्म गेला गरिबांच्या सेवेत. लहानपणापासून अखेरपर्यंत सारे आयुष्य गेले प्रचंड जन–समुदायांत, पण आयुष्यभर ते राहिले एकाकी ! धनिक असून समाजवादी, ऐश्वर्यशाली असून तुरुंगातील कैदी, सत्ताधारी असून विनम्र आणि क्रांतिकारक असून प्रेमळ ! वृत्ति योद्धयाची पण कल रसिकतेचा. धर्माबद्दल नाराज— नास्तिकही, पण धर्मात्मा व ईश्वरनिष्ठ गांधीजींचा भक्त ! विवेकी असून क्रान्तिकारक, चिकित्सक असून श्रद्धाशील, भोगवादी असून त्यागशील, नास्तिक असून निष्ठावन्त, कवि असून झुंझार, मूर्तिभंजक असून जनतेचे आराध्य दैवत बनलेले, देव न मानणारे पण देवमाणूस असलेले, असे ते अलौकिक पण एकाकी लोकाग्रणी होते.

जवाहरलालांच्या जीवनातील पहिली तेवीस वर्षे विद्यार्जनांत गेली. १९१२ ते १९२०पर्यंतचा काल सार्वजनिक सेवेच्या उमेदवारीत त्यांनी घालविला. १९२० ते १९२९ पर्यंतच्या कालात त्यांनी गांधीजींच्या स्वातंत्र्य–संग्रामातील झुंझार सेनानी म्हणून धडाडीने कार्य केले. १९२९ पासून त्यांनी आपल्या समाजवादी विचारांचा स्वतंत्रपणे व प्रभावीपणे पुरस्कार केला आणि १९४७ सालापासून स्वतंत्र भारताचे पंतप्रधान या नात्याने त्यांनी आपले समाजवादी ध्येय, परिस्थितीच्या पोलादी चौकटीत, शक्य तितके बसविण्याचा प्रयत्न केला. त्यांना सात वेळा काँग्रेसचे अध्यक्ष होण्याचा अद्वितीय मान जसा मिळाला; तसाच नऊ वेळा खडतर कारागृहवास भोगण्याचा प्रसंगही सहन करावा लागला. तो त्यांनी सहन केला, एवढेच नव्हे तर, त्या एकलकोंडया व कष्टप्रद कारागृहांतही आपले मन प्रसन्न व बुद्धी टवटवीत ठेवून, त्यांनी जगन्मान्य होण्याजोगी ग्रंथ-रचना केली.

म्हणून तर कवींद्र डॉ. रवींद्रनाथ टागोर यांनी पं. जवाहरलालांचे गुणवर्णन पुढील मनोरम शब्दांनी केले आहे–" जवाहरलाल हे

ऋतुराज वसंत आहेत. यौवन व विजयानंद यांचे ते प्रतीक आहेत. अन्यायाशी अदम्य युद्ध करून स्वातंत्र्यावर नि:शेष निष्ठा ठेवणारे ते आहेत. त्यांचा अढळ निर्धार, अचल धैर्य, अव्यभिचारी सत्यनिष्ठा व नीतिशुद्ध हेतु या गुणांनी त्यांनी उच्च स्थान कमावलेले आहे.सत्याच्या अपलापाने संकटे कोसळणार असली आणि असत्याच्या आश्रयाने सुखे लाभणार असली; तरी ते सत्याला विन्मुख होत नाहीत व असत्याला थारा देत नाहीत. तरुण भारताच्या सिंहासनावर खरोखर जवाहरलालांचाच हक्क आहे.''



राधाकृष्णन्

४

# तत्त्वज्ञ राधाकृष्णन्

उंच व सडसडीत शरीरयष्टी, गंभीर पण पाणीदार मुद्रा, तीक्ष्ण व चमकदार डोळे, आपल्या विचारा-प्रमाणेच चापून चोपून बसविलेले पांढरेशुभ्र मद्राशी पागोटे, अंगात गुडघ्यापर्यन्त स्वच्छ अंगरखा व तसेच शुभ्र धोतर–यामुळे पहाणाराला हिमालयाचेच एक धवल शिखर अवतीर्ण झाल्याचा भास होतो. हिमा-लयातून शांतपणे सतत स्रवत असणाऱ्या गंगानदीप्रमाणे श्री. राधाकृष्णन् यांच्या मृदु व घोटीव स्वरामधून शब्दामागून शब्द व वाक्यामागून वाक्ये झुळझुळ अखंड वाहत असतात.

त्यांच्या व्याख्यानात पंडित जवाहरलालांचे इंग्रजी भाषेवरील अलौकिक प्रभुत्व असून त्याला अस्खलित-पणाची जोड मिळालेली आहे. डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांच्याप्रमाणे वाक्प्रवाह अस्खलित असून त्यात उच्च विचारांची गंगा संगम पावलेली असते. श्री. कृष्ण मूर्तिप्रमाणे आध्यात्मिक विचारांचा कैलास श्री. राधाकृष्णन् दाखवितात, पण तो बुद्धीला व चिकित्सेला आवाहन करून. ना. शास्त्री यांच्याप्रमाणे स्वतः अगदी स्थिर व शांत राहून आपल्या वक्तृत्वाच्या सुगंधित वायुलहरी दशदिशात पसरविण्यात श्री. राधाकृष्णन् यांचा हातखंडा आहे. त्यांच्या

भाषणात मृदुता व मंजुलता असल्याने त्या वायुलहरीच्या पायात पैंजण घातल्यासारखेच वाटते. क्वचित कोठे बुद्धिगम्य विनोद, क्वचित कोठे विरोधाभासात्मक सुभाषिते, क्वचित कोठे उपनिषदातील उपमा या गुणसंपदेमुळे श्री. राधाकृष्णन् यांचे सर्व व्याख्यान जीवंत, वेधक, प्रेरक व संस्मरणीय होते.

हिंदुस्थानातील जीर्ण रूढी व भ्रष्ट धर्म यावर ते जितके कठोर प्रहार करतात, तितकेच तीक्ष्ण आघात पाश्चात्यांच्या भोगात्मक व निरीश्वर संस्कृतीवर ते करतात. पूर्वेकडील जुन्या धर्मकल्पनांना त्यांनी नवे तेज आणले आणि पश्चिमेकडील नव्या सुधारणांना जुन्या तत्त्वांचे अधिष्ठान मिळवून दिले. त्यांचे अंत:करण भूतकाळात रमत असले, तरी मस्तक भविष्यकाळात संचार करते. "पूर्व ती पूर्व व पश्चिम ती पश्चिम, दोघींची गाठभेट अशक्य'' ही किपलिंगची दर्पोक्ती त्यांनी धुळीस मिळविली.

भारतीय तत्त्वज्ञानाची ओळख पाश्चात्य जगाला नव्या परिभाषेत करून देण्याचे कार्य स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ इत्यादि महाभागांनी गेल्या शतकात सुरू केलेले आहे. ते जितके वाढेल, तितके इष्ट आहे – पाश्चात्य व पौरस्त्य या दोघांच्याही दृष्टीने. एकादा शोपेनहौर, एकादा मॅक्समुल्लर हिंदु तत्त्वज्ञानाचे एक एक पुष्प हाती लागताच स्वर्गसुख हस्तगत झाल्याप्रमाणे आनंदाने नाचू लागतो हे खरे, पण पाश्चात्य वहुजनसमाजाच्या डोळ्यावर संपन्नता व भोगवाद यांची झापडे लावलेली आहेत. त्यांची दृष्टी अंतर्मुख करण्याचे राधाकृष्णनांचे कार्य जगाच्या प्रगतीसाठी अवश्य आहे.

हिंदुधर्माला उजळा देणे व हिंदुधर्माचे तेज जगाच्या दृष्टीस पाडणे हे त्यांनी आपले जीवित–कार्य ठरविले. 'हिंदुधर्मच जगाला तारील' हा दृढ निश्चय त्यांच्या श्वासाश्वासातून प्रगट होतो. त्यांनी 'इंडियन फिलॉसफी' नावाचा दीड हजार पृष्ठांचा ग्रंथ लिहिला, तो केवळ आपल्या पांडित्याच्या प्रदर्शनार्थ नव्हे. "भारतीय तत्त्वज्ञान निवेदन करणे हे या ग्रंथाचे मुख्य कार्य नाही, तर पाश्चात्य विचार-परंपरेच्या कक्षेत ते आणून सोडणे हा माझा उद्देश आहे.'' असे त्यांनी त्यात स्वच्छ म्हटले आहे. या ग्रंथाच्या व्दारे, स्वाभिमान–बुद्धीने

वस्तुस्थितीचा विपर्यास न करता, साधार व सोपपत्तिक रीतीने, नवीन परिभाषेने, बुद्धिग्राह्य व तर्कपूत शैलीने, त्यांनी सर्व जगताला सिद्ध करून दाखविले की, तत्त्वज्ञानाची किंवा अध्यात्म–विचाराची भरारी साऱ्या जगात जितकी उंच पहावयास सापडते, तितकी ती भारतीय शास्त्रात सापडल्याशिवाय रहात नाही.

पदार्थविज्ञानशास्त्रातील शोधाबद्दल नोबेल पारितोषिक कमावणारे सर चंद्रशेखर रमण हे मद्रासचेच. त्यांचा व राधाकृष्णनांचा जन्म एकाच वर्षी झाला. दोन देदीप्यमान तारे एकाच वेळी चमकले. दोघाही विद्वानांचा जीवनप्रवाह काही अंतरापर्यन्त एकाच दिशेने वहात गेला-मात्र दोघांची प्रत्यक्ष भेट झाली तिशीनंतर! इतके निकट साम्य दोन समकालीन लोकोत्तर पुरुषात क्वचितच दृष्टीस पडते. दोघांनीही शाळेच्या चिमण्या जगात बाळपणीचा रम्य काळ काढला, तो वाल्टेर येथे. आसमंतातील मनोहर सृष्टिसौंदर्यावर लोळत त्यांनी मोठ्या मजेत शाळेतील शिक्षण संपविले. राधाकृष्णन् १५ व्या वर्षी मॅट्रिक झाले, तर रमण १२ व्या वर्षीच ती परीक्षा उत्तीर्ण होऊन पुढे झटकले. १९०४ मध्ये रमण बी. ए. झाले, तेव्हा पहिल्या वर्गात आलेले ते एकटेच विद्यार्थी होते. राधाकृष्णन् यांनी हा एकुलतेपणाचा मान एम. ए. च्या परीक्षेचे वेळी पटकावला.

१९२६ साली केंब्रिज येथे ब्रिटिश साम्राज्यांतील 'विद्यापीठांची कॉंग्रेस' भरणार होती. तिला आपला प्रतिनिधी म्हणून कलकत्ता विद्यापीठ राधाकृष्णन्शिवाय दुसऱ्या कोणाची निवड करणार? ते इंग्लंडला जाणार अशी बातमी हिंदुस्थानांतून बाहेर पडताच, इंग्लंडा-तील विविध संस्थांकडून राधाकृष्णन् यांना व्याख्यानांची निमंत्रणा-मागून निमंत्रणे येऊ लागली.

'अप्टन व्याख्यानमालेचा', हिंदी माणसाला अपूर्व असा, मान त्यांना मिळाला खरा, पण योगायोग असा की, राधाकृष्णन् यांची व्याख्याने ठरली, ती वेळ तेथील नौका–विहाराची होती. त्या क्रीडेला विशेष महत्त्व होते. निरनिराळ्या कॉलेजातील विद्यार्थ्यांची ती बोटिंगची शर्यत अत्यंत चुरशीची व उत्सुकतेची असे. विद्यार्थी व प्राध्यापक, पट्टेवाला व प्रिन्सिपल–झाडून सारे लोक ती शर्यत पहाण्यास न चुकता

जात, मग दुसरा कसलाही कार्यक्रम बुडाला तरी बेहेत्तर. पण अशी विरुद्ध ओढ असताही, राधाकृष्णन् यांच्या व्याख्यानाचे वेळी सभागृहांत मुंगीलाही रीघ नव्हती ! राधाकृष्णन् यांच्या भाषण-प्रवाहावर चाल-लेली पौरस्त्य व पाश्चात्य तत्त्वज्ञानांची शर्यत पाहण्यातच,, सर्वजण गुंग !

'विक्रम केला तुम्ही !' असे उद्‌गार, ती बौद्धिक शर्यत संप-ल्यावर, प्रिन्सिपल जॅक्सन यांनी काढले, एवढेच नव्हे तर, आभार मानताना त्यांनी अशी प्रांजल कबुली दिली की, "आज आमच्या मनात आध्यात्मिक विचारांचा नवाच प्रकाश पडला. व्याख्यान चालू असता त्यात असे काही क्षण आले की तेव्हा, "तर मग मी हिंदू होतो." असे मी मनात म्हणालो."

१९३६ साली त्यांना ऑक्सफर्ड विद्यापीठाने पंधरा वर्षासाठी 'स्पार्लिंडग प्रोफेसरशिप' देऊ केली. धर्माचा तौलनिक अभ्यास हा विषय त्यांच्या आवडीचा व अभ्यासाचा. त्यामुळे त्यांनी हे निमंत्रण स्वीका-रणे इष्टच. पण त्यावरोबरच आपल्या मायभूमीच्या सेवेला आपण कसे मुकावे ? हा पेचप्रसंग सोडविण्यासाठी ऑक्सफर्ड येथे, वर्षातून सहाच महिने जाण्याचे त्यांनी कबूल केले. १९३९ साली दक्षिण आफ्रिकेत त्यांना व्याख्यानाचे निमंत्रण आले, तेव्हा ते तिकडे जाऊन आले. आंध्र व बनारस विद्यापीठाचे ते कुलगुरु होते.

त्यांना १९५३ साली शैक्षणिक क्षेत्रांतून राजकीय क्षेत्रांत संक्रमण करावे लागले. स्वतंत्र भारत सरकारने त्यांना १९४९ ते १९५२पर्यंत रशियांत आपले राजदूत म्हणून नेमले. १९५२ सालापासून ते उप-राष्ट्रपति म्हणून दोनदा निवडून आले आणि राज्यसभेचे सभापती म्हणूनही त्यांनी मोठा लौकिक संपादिला.

'भारत–रत्न' ही परमोच्च पदवी त्यांना १९५४ साली मिळाली. त्यांचा एक पाय भारतात, तर एक पाय युरोपांत असे. विज्ञानांत गगनभेदी उड्डाण करणाऱ्या पाश्चात्यांना भारतीय तत्त्वज्ञानांतील अध्यात्मज्ञानाचे घुटके ते पाजीत असतात. पुणे येथे एकदा ते म्हणाले, "हंगेरी, हॉलंड व जर्मनी या देशांच्या राज्य-प्रमुखांनी एकमुखाने मला सांगितले, 'आमचे वैभव

वाढत आहे, पण सौख्य मात्र वाढत नाही.' माझ्या मते, धर्म, कला व साहित्य यांची आवश्यकता सौख्याच्या वाढीला खचित असते.''हाच अध्यात्माचा, शांततेचा व सौख्याचा संदेश भारताच्या राष्ट्रपति-पदा-वरूनही सर सर्वपल्ली १९६२ पासून १९६७ पर्यन्त सर्व जगताला देत होते.

त्यांची माझी प्रत्यक्ष मुलाखत झाली पुणे येथे १९३८ साली. संध्याकाळची वेळ होती. शहरात व्याख्यान देऊन ते आपल्या निवास-स्थानी आले होते. कपडे काढल्यावर ते मला म्हणाले,

'बोला, काय काम आहे तुमचं ?'

'मी आपलं छोटेखानी चरित्र लिहीत आहे. त्यासाठी आपले ग्रंथ मी थोडेबहुत पाहिले आहेत. तेव्हां दोनच प्रश्न विचारतो.'

'विचारा.'

'आपल्या वक्तृत्वांतील यशाचे रहस्य काय ?'

'मी फार थोडं बोलतो—वीस मिनिटापेक्षा बहुधा मी जास्त बोलत नाही. भाषण सुरू करताना, मला अजून वाटतं, हे संपेल केव्हा ? स्पष्ट विचार आणि शुद्ध वाणी याकडे मी लक्ष देतो.'

'आपण जगभर संचार करता, तर जगात साक्षात्कारी पुरुष आपल्याला कोणी आढळले काय ?'

'होय. दोन साक्षात्कारी पुरुष मी पाहिले. एक रमणमहर्षि अन् दुसरे गुरुदेव रानडे. He is visited by the grace of God.'

गांधीजीवर त्यांची गाढ श्रद्धा आहे. म्हणून गांधीजींच्या ७५ वे वाढ—दिवशी त्यांनी गांधी-गौरव-ग्रंथाचे संपादन केले.

[illegible], [illegible].
[illegible] ........................
[illegible]........ .... ... [illegible]..........



मालवीयजी

५

# महामना मालवीयजी

‘वंदे मातरम्’ हे गीत ‘आनंदमठ’ कादंबरीत मी वाचले होते. ते वाचीत असता माझे शरीर रोमांचित झाले होते, हृदय उन्नत झाले होते आणि वाटले होत की, ‘सुखदा वरदा’ खरी भारतमाता--शुभ्र--ज्योत्स्ना--पुलकित आणि शस्य--शामल असा हिंदुस्थान एकच आहे, आणि तो म्हणजे--नगाधिराज हिमालयाच्या चरणापाशी, नदाधिराज्ञी भागीरथीच्या परिसरात तीर्थराज--क्षेत्राच्या सान्निध्यात, उत्तर हिंदुस्थानात वसणारा, फुलणारा, पिकणारा वंग प्रदेश !

पंच--प्रांतीय प्रवास करून वंगभूमीचे नख दृष्टीस पडताच माझा सारा प्रांताभिमान गळून पडला व खऱ्या हिंदुस्थानची ओळख पटली. निःसीम त्याग, प्रखर बुद्धिमत्ता वगैरे मानवी गुणांची महाराष्ट्रीय संपदा अर्थातच मी कदापि विसरू शकत नाही; पण सृष्टीदेवीने भौतिक संपत्तीचे जे चुडेदान वंगभूमीच्या ओटीत घातले आहे, त्याचे मोलही मी कधी कमी करू शकत नाही. ज्ञानेश्वरीतील वाणी ही मला गंगेसारखी पवित्र, प्रसादयुक्त व दैवी वाटते. श्रीसमर्थांचे प्रवृत्तिपर तत्त्वज्ञान हे ज्ञानव्यापीसारखे मला स्फूर्तिदायक, कार्यप्रेरक व शांतिपोषक भासते. लोकमान्य टिळकांचे चरित्र हे देवतात्मा हिमाचलाइतके

उत्तुंग, शुभ्र व सामर्थ्यसंपन्न मला दिसते. पण निसर्गाने बंगालला जे उंची ऐश्चर्य दोन्ही ओंजळी भरभरून दिले आहे; ते मी कसे नाकारू? त्याचे मोल कसे उणावू ? त्याचे रम्यत्व कमी कसे लेखू ?

१९४१सालच्या प्रारंभी मला वंग-भूमीचे दर्शन घडले.मुंबई प्रांतातील खानदेशी कापूस पहात पहात मी मध्यप्रांतात प्रवेश केला व नागपुरी संत्र्यांच्या बागा नजरेखाली घातल्या. दुसरे दिवशी बिहार, ओरिसा प्रांतही पादाक्रांत केले आणि--एकदम सृष्टीपालटली! आगगाडीच्या लोहमार्गाशी समांतर असा जलमार्ग मैलन् मैल दिसू लागला. ओबडधोबड डोंगराच्या राकट रांगा नजरेआड झाल्या. सपाट, विशाल भूभाग, दृष्टी फेकावी तिकडे रम्यच रम्य--क्षितिजापर्यन्त पसरलेला, सज्जनांच्या मनाप्रमाणे विस्तीर्ण व कोमल--उंचसखल नाही, खाचखळगे नाहीत, कठीण दगड-धोंडाही नाही, मग टेकडी-डोंगर--पर्वत कोठला ? कोठे गव्हाचे गुडघ्या-एवढे लुसलुशीत हिरवेगार पीक बालकाप्रमाणे डोलत आहे, तर कोठे कमरेइतक्या उंचीच्या सडसडीत तुरी मंगळागौरीतील मुलीप्रमाणे लाडिकपणे वडवडत आहेत. आंब्याच्या वर्फीप्रमाणे चौकोनी तुकडे व्यवस्थितपणे पाडलेली भाताची खाचरे व युवकाच्या आकांक्षा-प्रमाणे उंचच उंच असणारी नारळाची झाडे, ही तर सर्वत्र नयना-मनाला हरखून सोडीत आहेत, असा रमणीय देखावा एकसारखा दृष्टीपुढे चाललेला. त्यामुळे आपण विशाल कोकणच पहात आहो, असे मला वाटले. निर्मळ जळ तळचातळचातून चमकत होते--आणि त्यात आरक्त कमळे फुललेली ! "पाण्यावरील गालिचे" खरे हे ! पानमळ्यांचा विशेष दिसला तो हा की, तेथल्या कडाक्याच्या थंडीपासून बाधा होऊ नये म्हणून चोहोबाजूनी ते एखाद्या घरात ठेवल्याप्रमाणे झाकलेले आहेत.

अशा अभूतपूर्व आनंदात चित्त तरंगत असतानाच, मी कलकत्त्यास १९४१ च्या जानेवारीत पोचलो. प्लॅटफॉर्मवर उतरताच दुटप्पी---ाची मौज दिसली. स्टँडर्ड टाइम दाखविणारे एक घड्याळ, तर दुसरे घड्याळ त्याच्यापेक्षा पंधरा मिनिटे पुढे धावणारे. शहराचे नाव कलकत्ता, पण स्टेशनाला म्हणतात हावरा. स्टेशनाजवळील नदीचे नाव विचारले तर 'हुगळी', पण आहे वस्तुतः गंगाच ! आणि तीही केवढी ? तर काशीच्या गंगेपेक्षा तिप्पट-चौपट मोठी ! तिच्यावर पोलादी

पूल बांधलेला. तो इतका अजस्र आहे की, मान मागे झुकविल्याखेरीज त्याचे आभाळाला भिडलेले टोक दिसतच नाही. कलकत्ता शहर अफाट–वातुल माणसासारखा त्याचा विस्तार प्रचंड. गावठाण मोठे, पसारा दांडगा, लोकवस्ती ६० लाख–म्हणजे मुंबईपेक्षा अधिक पण पानापाचोळ्यांनी झांकलेल्या जुनाट झाडासारखी त्याची स्थिती. तेथील किळसवाणी रूढी–माणसांनीच माणसांना वाहून नेण्याची– रिक्षाची ! दोनदोन, तीनतीन माणसे, नवाबाच्या रूबाबात बसून, एका माणसाकडून स्वतःला वाहून नेत असताना पाहिली, तेव्हा वाटले, " नरेची केला हीन किती नर ! '' गुलामगिरीची ही दुष्ट रुढी बंगालीबाबूंच्या इतकी अंगवळणी पडून गेली आहे की, "मोटारींनी परदेशाला पैसा जाण्यापेक्षा आपल्याच माणसांना पैसे देणारी ही पद्धत स्वदेशी व परोपकारी आहे. '' अशा तत्त्वज्ञानाचा सोनेरी मुलामा आपल्या अ-मानुष चालीवर ते चढवितात! याच न्यायाने नरमांसभक्षण का चालू करू नये ? विसाव्या शतकात रिक्षाची राक्षसी रुढी चालू रहावी, एवढेच नव्हे तर, काशी, नागपूर वगैरे ठिकाणी बेकारीमुळे नव्याने चालू व्हावी, ही हिन्दी दारिद्र्याची केवढी भयंकर साक्ष आहे ! तिकडे सिंगापूरला ही अमानुष चाल नष्ट होत आहे, आमच्याकडे मात्र ती नव्या नव्या शहरावर चाल करून जात आहे !

हा अनैतिक व्यापार फार वेळ पहावत नाही, म्हणूनच की काय, सूर्यनारायण संध्याकाळी (स्टँ.टा.) ५ वाजताच पश्चिम सागरात शोकावेगाने बुडी मारतो ! दिवसभरही त्याचे तेज मंदच होते. थंडी चमका मारीत होती. मोठी मैदाने कलकत्त्यात खूप आहेत. बंगलोर हे जसे उद्यानांचे, धारवाड हे जसे टेकड्यांचे, तसे कलकत्ता हे मैदानांचे (पार्क) शहर आहे.

एकीकडे ताग व नीळ यावर गबर झालेले जमिनदार व दुसरीकडे अन्नपाणी न मिळणारे मजूर–असे दोनच वर्ग येथे मुख्यतः दिसले– मध्यमवर्ग कमी. बंगाल म्हणजे भारतभूमीच्या किरीटातील लखलखीत हिरा, आणि त्याचा एक तेजस्वी पैलू म्हणजे धर्मात्मा पं. मदनमोहन मालवीय. त्यांचे वय ऐंशी वर्षांचे होते. त्यांच्याच बंगल्यांत मी उतरलो होतो.

तो क्षण माझ्या स्मृतीत सतत राहील. रात्री आठ वाजण्याची वेळ. पंडीतजींच्या संकेतानुसार मी दुसऱ्या मजल्यावरील खोलीत पाऊल टाकले. भारताचे हे भीष्माचार्य आराम करीत असतील अशी कल्पना–पण ती कल्पनाच ठरली. टेबलावरील इंग्रजी पुस्तक पंडितजी उचलीत होते. त्यांचा हात वार्धक्याने एकसारखा थरथर कापत होता. शरीर वाकलेले होते. पुस्तक घेऊन ते पलंगावर बसले. पातळ खादीची पांढरी टोपी मस्तक शोभवीत होती. अंगात रेशमी सदरा व तसाच पायजमा. अंत:करणाची विशुद्धता बोलणारे स्वच्छ पाणीदार डोळे आणि मुखावरील हिम–सम धवलिमा. शिक्षकी, संपादकी व वकीली या धंद्यापासून हिंदुसभा, राष्ट्रसभा व राष्ट्रीय पक्ष यांच्या अध्यक्ष-स्थानापर्यंत नाना रूपांनी स्वदेशाची व स्वधर्माची सेवा करण्याचे कामी चंदनाप्रमाणे झिजलेले ते शरीर राष्ट्रमातेच्या सेवेतच खर्ची पडावे अशी त्याची अंतरीची इच्छा होती.

" हिंदु तेवढा एक " अशी ऐक्य-भावना निर्माण करण्यासाठी " ॐ नमो नारायणाय " हा मंत्र सकाळी व " ॐ नम: शिवाय " हा मंत्र संध्याकाळी आशूद्रब्राह्मण सर्वांनी जपावा आणि प्रत्येक हिंदूने रुद्राक्षाचा मणी गळ्यात घालावा, हा विचार ते पुन: पुन: ऐकवीत होते. त्यांचे ते विचार इंग्रजी व हिंदी या भाषातून ऐकणे म्हणजे गंगाजलामध्ये स्नान करणेच होय. गीतेतील नेहमीचाच संस्कृत श्लोक, पण तो मालवीयजींच्या रसनेतून आला की, साखरपाकात घोळल्याप्रमाणे मधुर, स्वच्छ व पावन वाटे. खारट पाणीही गोड करून देण्याची मेघराजाची कुशल कला मालवीयजींइतकी कोणास क्वचितच साधली असेल. नवनीतासारखे मृदु त्यांचे हृदय आहे व हृदयासारखे मृदु त्यांचे सर्वांग होते. केळीचे सारे अवयव जसे मऊ किंवा चंदनाचे पानन्‌पान जसे सुगंधी, तसे या धर्मात्म्याचे वागणेबोलणे सत्य व प्रिय असे.

त्यानंतर पुरे तीन दिवस माझा मुक्काम पंडितजींच्याच घरी होता; पण निवांतपणे त्यांच्याशी बोलण्याला मला अर्धा तासदेखील सापडला नाही, इतकी त्यांच्यामागे कामाची गर्दी! गांधीजी तर पंडितजींना आपले 'थोरले भाऊच' मानीत. बनारसचे हिंदु विद्यापीठ म्हणजे पंडितजींच्या कर्तृत्व–शक्तीचा स्मारक–स्तंभच. ते विस्तीर्ण व

विविधांगी विद्यापीठ पाहून मी विस्मयचकित झालो. त्या निमित्ताने कलकत्त्याच्या त्यांच्या निवासस्थानात किती तरी कार्यकर्ते व विद्वान येत.

कलकत्त्याहून निघण्याच्या आदल्या दिवशी मी एक धाडस केले. मनात म्हटले, " इतके दूर आपण आलो आणि रिकाम्या हातांनी परत जाणार म्हणजे काय ? क्षीरसमुद्राच्या काठावर जाऊन गिंडीभरही क्षीर न नेण्याचा कद्रूपणा का करा ? '' म्हणून मीच स्वतः, महाराष्ट्राला मालवीयजींनी द्यावयाचा संदेश इंग्रजीत लिहून रात्री त्यांचेकडे घेऊन गेलो. मुलाखतीत विचारावयाच्या प्रश्नांची यादीही मीतयार ठेवली होती.

त्या कोमल हास्य–मुखांतून रेशमी स्वरात स्वागताचे शब्द माझ्या कानी पडले. मी पंडितजींना अभिवादन केले व त्यांच्यासाठी मी बनविलेल्या छोटया संदेशाचा कागद त्यांच्यापुढे धरला. तो पहाताच त्या ऋषीने माझे मनोगत ताडले व माझे दोन्ही हात आपल्या हातांत घेऊन हसतहसत म्हटले, " छे: छे: छे:, शिखरेजी, माझी काम करण्याची पद्धत ही नाही. इतक्या घाईने मी कधीच काही करीत नाही. नामदार गोखलेही मला म्हणायचे, तुमचे काम फार मंद गतीने चालते. पण मला वाटते. तेच अधिक यशस्वी होते. एक उदाहरण सांगतो तुम्हाला शिखरेजी. '' असे म्हणून पंडितजी मोठ्या कळकळीने, सावकाशपणे एकएक शब्द उच्चारीत म्हणाले, "बनारस हिंदु विद्यापीठाची परिचय-पुस्तिका आम्हाला तयार करावयाची होती. ती साधी छोटीं पुस्तिका तयार करण्यास मला किती काळ लागला, माहीत आहे ? तब्बल सहा महिने ! '' आणि पंडितजी खोखो करून हसू लागले, मग पुढे म्हणाले, " पण ती पुस्तिका कशी होती? कोणत्याही संस्थानिकाकडे ती फेकण्याचा अवकाश की, त्यांचेकडून हजारो रुपयांची देणगी हटकून यायचीच. सर्वांगपूर्ण कार्य केले की यश ठेवलेले ! ''

" मग आपल्या संदेशाचे काय ? '' मी दबत्या आवाजात विचारले.

" तो मी आताच देणे अशक्य ! सवडीने पाठवून देईन. ''

त्यांच्या चरणाला स्पर्श करून मी तेथून बाहेर पडलो आणि त्या विनम्र पण कर्तृत्वसंपन्न, नेमस्त पण बाणेदार, सनातनी पण सुधारणावादी अशा महामना मदनमोहन मालवीयजींचा आशीर्वाद व आदरभाव अंतःकरणात बाळगून मी पुण्यास परत आलो.



**जयप्रकाश नारायण**

६

# जयप्रकाशजींच्या सान्निध्यात

शिर्डीचे साईबाबा ! त्यांच्याबद्दल उलटसुलट मी खूपच ऐकले होते, पण त्यांच्या दर्शनास जाण्याचे माझ्या मनात कधीच आले नव्हते–किंबहुना तसा योग कधी-काळी येईल, असे माझ्या स्वप्नातही नव्हते. पण १९६८ च्या ऑगस्ट महिन्यात, तो योग म्हणा किंवा प्रसंग म्हणा, मला आला.

पुण्यामुंबईत टॅक्सीत, रिक्शात, हॉटेलात – सर्वत्र, मांडी घालून बसलेल्या व डोक्याला फडके गुंडाळलेल्या साईबाबांचे फोटो मी नेहमी पहात असे. माझे काही वकील–डॉक्टर मित्रही बाबांच्या चमत्कारांचे रसाळ वर्णन माझ्या कानी घालीत असत. नवसाला हटकून पावणारे दैवत, म्हणून बाबांची पूजा अडाणी व शहाणे दोघेही करताना मला दिसत. पण मी तेथे गेलो ते "बाबां"च्या दर्शनाला नव्हे. शिर्डी येथे भरणाऱ्या "सर्वोदय मंडळा"च्या संमेलनास उपस्थित राहण्यासाठी मी तेथे गेलो. त्या संमेलनाचे अध्यक्ष होते, श्री. जयप्रकाश नारायण.

श्री. जयप्रकाशजींची स्वातंत्र्य–संग्रामातील साहसे जशी मी ऐकली होती, तशीच भूदान – आंदोलनातील त्यांचे पराक्रमही मी वाचले होते. आणि त्यामुळे त्यांच्याविषयी माझ्या मनात अपार आदर वसत

होता. त्यांच्या भेटीची ओढ पुष्कळ वर्षे माझ्या मनाला लागलेली होती.

पं. नेहरूंच्या तोलामोलाचा हा राष्ट्रनेता आहे, अशी खूणगांठ माझ्या मनाने केव्हाच वांधली होती. मनात आणले तर जयप्रकाशजी काँग्रेसचे अध्यक्ष झाले असते – खुद्द गांधीजींनी १९४७ साली तशी सूचना केली होती. त्यांनी आपली मान जरा "उजवीकडे" झुकविली असती तर, ते केंद्रीय मंत्री–किंबहुना राष्ट्रपतीही – सहज झाले असते. समाजवादाचा पुरस्कार करणारे " साथी " जयप्रकाशजी हे तरुणांचे लाडके नेते असावेत यात नवल काय ?

हिंदी तरुणांचे तीन लाडके नेते म्हणजे, पं. जवाहरलाल, सुभाषचंद्र व जयप्रकाशजी. पैकी, देशगौरव सुभाषचंद्र 'डावीकडे' झुकले व 'आझाद हिंद फौज' स्थापन करून दिगंतकीर्त झाले; साथी जयप्रकाश उजवीकडे वळले आणि भूदान-आंदोलनाने लोकशक्ती समर्थ करण्यासाठी झटू लागले. पं. नेहरू मात्र आधी काँग्रेसमध्ये व नंतर काँग्रेस सरकारमध्ये स्थिर राहिले आणि राष्ट्राचे भवितव्य दीर्घकाळ घडवीत राहिले. सुभाषचंद्र व जयप्रकाश या दोघांपैकी कोणीही, संधी आली असती तर, पं. नेहरूंप्रमाणेच स्वतंत्र भारताचे पंतप्रधान झाले असते. "There were evidences that he undoubtedly would or could have been Nehru's successor. He is a political philosopher of the first order." असे मि.डॅनियल पी. हॉफमन यांनी आपल्या 'India's Social Miracle' या पुस्तकांत स्वच्छपणे म्हटले आहे.

जयप्रकाशजींचे चरित्र म्हणजे परिस्थितीच्या लाटांवर स्वार होणारे. अमेरिकेत १९२२ ते १९२९ पर्यंत सात वर्षे एका विद्यापीठांत ते अभ्यास करीत होते–विशेषत: मार्क्सवादाचा. "मळयात व कारखान्यात मोलमजुरी करून मार्क्सवादाचे आकंठ पान मी तेथे केले" असे ते सांगतात.

भारतात परत आल्यावर, जयप्रकाशजी येथील कम्युनिस्ट पक्षाचे सभासद झाले. पण त्या पक्षाच्या रशियांकित धोरणाला विटून त्यांनी 'काँग्रेस समाजवादी पक्षात' प्रवेश केला. नीती व राजनीती यांची सांगड घालणाऱ्या गांधीजींचा प्रभाव त्यांचे मनावर अधिकाधिक पडत गेला व त्यामुळे साधन–शुचिता व अहिंसा या गांधीय तत्त्वांचा

पगडा जास्तजास्त पडू लागला. सत्यनिष्ठा, अहिंसा, विकेंद्रित अर्थ-व्यवस्था व लोकशाही या मूल्यांवर आधारलेला "प्रजासमाजवादी पक्ष" त्यांनी स्थापन केला. १९५७ मध्ये त्यांनी 'समाजवादाकडून सर्वोदयाकडे' या नावाचे पत्रक प्रसिद्ध केले व स्वतःचे 'जीवनदान' केले आणि भू-दान–ग्रामदानाच्या कार्यास वाहून घेतले. आता तर त्यांनी 'विहार–दाना'चाच संकल्प सोडला आहे. गेल्या वर्षीच्या भीषण दुष्काळाच्या वणव्यांतून विहाराचा बचाव करण्यात त्यांनी जो पुरुषार्थ प्रगट केला, तो पाहता त्यांचा हा महान संकल्पही सिद्धीस जाईल आणि भारतापुढे नवा आदर्श ठेवला जाईल, यात शंका नाही. ऑस्ट्रेलियांत गांधीवादाचा प्रचार करण्यासाठी ते नुकतेच जाऊन आले.

विशुद्ध चारित्र्य, साहसी देशभक्ती, निर्लोभी वृत्ती आणि अविरत जनसेवा–या गुणांचा संगम असलेले जयप्रकाशजी शिर्डी येथे मला जवळूनच पहावयास मिळाले, एवढेच नव्हे तर, १५-२०मिनिटे तरी त्यांच्याशी एकटयाने मुलाखत घेता आली, याचे मला मोठे समाधान वाटले.

मंगळवार ता. १३ ऑगस्ट १९६८ या दिवशीची ती मंगल प्रभात! सकाळी ८॥ ची वेळ माझ्या मुलाखतीसाठी दिलेली. सूर्योदयापासून रात्री १० वाजेपर्यन्त जयप्रकाशजींचा कार्यक्रम भरगच्च भरलेला. त्यांतून १५-२० मिनिटे आपल्याला मिळाली तरी ते आपले भाग्य, असे मी समजलो आणि नियोजित वेळी, नतमस्तकाने,त्यांच्या निवासस्थानी प्रवेश केला. आत जाऊन मी नमस्कार करताच, जय-प्रकाशजी खुर्चीवरून उठले, आणि स्मित वदनाने नमस्कार करून, त्यांनी माझे स्वागत केले. त्यावेळी मला, चौदा वर्षांपूर्वी दिल्ली येथे अनुभवलेल्या, पंडितजींच्या प्रेमळ आदरातिथ्याची आठवण झाली. माझ्या उंचीचा गर्वहरण करण्याइतकी उंची आणि गोरेपणाचा अभि-मान घालविण्याइतका गोरेपणा जयप्रकाशजींच्या अंगी आहे. अंगात पांढराशुभ्र खादीचा गुडघ्यापर्यंत पोहोचणारा सदरा व तसेच पांढरे स्वच्छ धोतर दिसत होते. त्यांच्या टक्कल पडलेल्या मस्तकावरही चार-दोन रुपेरी केस भुरभुरत होते. बोलताना त्यांचा उजवा पाय

हले–जणू काही डोक्यातील विचार–चक्राला गती देण्यासाठीच ते पाय मारीत आहेत. मी मुद्दाम विनंती करून, खास आम्ही दोघांनीच मुलाखतीचे वेळी असावे, असे ठरले होते. त्याप्रमाणे आधी आलेले ज्येष्ठ सर्वोदयी नेते, मुलाखतीस सुरुवात होण्याआधी, त्या खोलीतून बाहेर गेले होते. पण मुलाखत सुरु झाल्यानंतर थोड्याच वेळाने दुसरे एक कार्यकर्ते त्या स्थानी अकस्मात घुसले, तेव्हा जयप्रकाशजींनी "आम्ही गंभीर विषयाची चर्चा करीत आहोत'', असे हसत हसत सांगून त्यांना वाटेस लावले. पण, काय गंमत पहा, ते दोघे कार्यकर्ते, जणु काही मयूनच, पुनः तेथे आले, आणि त्यांनी आपला "मराठी बाणा' प्रगट केला. तथापि, जयप्रकाशजींचे बोलणे माझ्याशी एकतानतेने चालू होते.

या मुलाखतीत मी जयप्रकाशजींना तीन प्रश्न विचारले. गांधीजी, विनोबाजी व पंडितजी या तीन पुरुषोत्तमांना विचारलेलाच एक समान प्रश्न मी जयप्रकाशजींना प्रथम विचारला, तो म्हणजे "ईश्वराचे स्वरूपाविषयी आपली कल्पना व आपला अनुभव काय आहे ?'' प्रश्नाची प्रस्तावना करताना मी त्यांना म्हटले, "आपण मार्क्सवादाचे अभ्यासू, तेव्हा आपली ईश्वरावर श्रद्धा नसेल– आपण नास्तिक असाल–असे मला वाटत होते. पण आपली अलीकडील भाषणे वाचल्यानंतर त्यात मला ईश्वराचा उल्लेख वारंवार आढळला, म्हणून मी हा प्रश्न विचारीत आहे.'' हा प्रश्न ऐकताच जयप्रकाशजी किंचित काल स्तब्ध राहिले– गंभीर झाले–अंतर्मुख बनले, आणि समोर पहात, स्वगत बोलल्याप्रमाणे, त्यांच्या प्रसन्न मुखातून एकेक शब्द सावकाश बाहेर पडू लागला–

"आतापर्यन्त मी या विषयाची चर्चा कोणापाशी कधी केली नाही. एकदा मी तीन दिवसांचा उपवास केला होता – कशासाठी नाही, कोणाविरुद्ध नाही. पण त्या उपवासात माझे चिंतन सुरू होते. "चांगले का वागावे ? '' याचे उत्तर माझे मन शोधीत होते. समाजाच्या भल्यासाठी आपण भले वागावे, हा मार्क्सचा सिद्धान्त माझे पूर्ण समाधान करू शकत नव्हता. "समाजाचे भले तरी मी का करावे ? '' असा प्रश्न माझी बुद्धी मला करीत होती. माझी पत्नी

प्रभावती–ही गांधीनिष्ठ, त्यामुळे मी गांधीजींच्या जवळ गेलो होतो. त्यांचे विचारही यावेळी मला आवडत होते. "साधने कोणतीही असली तरी चालतील, साध्य चांगले असले म्हणजे झाले." या साम्यवादी विचारसरणीचा अपुरेपणा मला जाणवू लागला होता. गांधीजींचा साधन–शुद्धीचा विचार मला पटला होता आणि त्याचीच परिणती अध्यात्म–विचारात (Spirituality) झाली. याहून या विषयावर अधिक काही सांगण्यास मी समर्थ आहे, असे मला वाटत नाही. त्यानंतर मी "Incentive to Goodness" हा लेख लिहिला, आणि त्यात या विषयाचा थोडाफार ऊहापोह मी केला."

"तीन वर्षांत ब्रह्मज्ञानी होण्याची प्रतिज्ञा" विनोबांनी एका खाजगी पत्रात केल्याचे मी जयप्रकाशजींना सांगताच ते म्हणाले, "हा विषय शब्दांनी सांगण्यासारखा आहे कोठे? यासंबंधी कोण कोणाला सांगू शकेल?" तेव्हा मी सहज म्हटले, "शाखा–चंद्र–न्याय संस्कृतात आहे–झाडाच्या फांदीने आकाशातील चंद्र दाखविता येतो, तसे भाषेच्या शब्दाने ईश्वराचे स्वरूप दिग्दर्शित करता येते, आणि तसे करणारे संत–साधु–सज्जन हे मार्गदर्शक ठरतात."

पुणे येथे जयप्रकाशजींनी तीन आठवड्यांचे उपोषण केले. त्या वेळी त्यांनी सूक्ष्म चिंतन केले. त्याचे फल म्हणजे साम्यवादाकडून सर्वोदयवादाकडे ते वळले. मार्क्सवादाला रामराम ठोकण्यास कोणता विचार कारणीभूत झाला, हे सांगताना ते म्हणतात,

"रशियामध्ये विरोधकांचे शिरकाण सुरू झाले, तेव्हापासूनच मार्क्सवादासंबंधी माझ्या मनात शंका येऊ लागली. विचार करता करता मला असे स्पष्ट दिसून आले की, मनुष्याने नीतीने का वागावे, याला उत्तर मार्क्सवाद देत नाही–चांगुलपणाला प्रेरणा देण्यासारखे त्यात काही नाही. मी चांगले का वागावे? दुसऱ्यासाठी त्याग का करावा? हाल का सोसावे? याला उत्तर मार्क्सवाद देऊ शकत नाही. केवळ जड वस्तूतूनच मानवी सदाचार व सामाजिक संस्कृती निर्माण होणारी असली, तर मानवाने उदार, प्रेमळ, निर्लोभी--म्हणजे चांगले–का व्हावे? दीन दरिद्र्याविषयी सहानुभूती–अनुकंपा का वाळगावी? मृत्यूनंतर माती मातीत मिसळून सर्व नष्टच होणार

काय ? तसे असेल तर, नीतीने वागण्यास प्रेरणा कोणती ? सत्ता-लोभ, द्रव्यलोभ, लोकैषणा यामुळे कार्याला प्रेरणा मिळत असेल, पण ते कार्य चांगलेच असले पाहिजे, असे जडवाद सांगू शकत नाही. समाज--सेवा, स्वार्थ--त्याग, समता, स्वतंत्रता--इत्यादि तत्त्वांची शिकवण एखाद्याला मिळालेली असेल; पण त्यासाठी मी कष्ट का करावेत? हाल का सोसावेत ? नुकसान का सहन करावे ? असे प्रश्न त्याच्या मनात उद्भवले, तर जडवादी तत्त्वज्ञान त्याला काहीच उत्तर देऊ शकत नाही.

मानवाला इच्छा–स्वातंत्र्य नाही, हे उत्तर मार्क्सवादाशी विसंगत आहे. ' क्रांतिकारक नीति म्हणून मार्क्सवादी खूप सांगतात, पण त्याचा अर्थ, साध्यावरून साधनाची परीक्षा होते, इतकाच. तो मला रुचण्यासारखा नाही. विज्ञानांत द्वैत मोडत नाही, अध्यात्मातच ते नष्ट होते. या अद्वैताचा साक्षात्कार--आत्मसाक्षात्कार--हाच नीति-मत्तेचा पाया होय असे मला वाटते. अशा साक्षात्कारी माणसाला नीतीने वागणे हे श्वासोच्छ्वास करण्याइतके सहज, अनायासे, घडते. उलट जडवादातून स्वार्थ निपजतो, स्पर्धा फोफावते आणि हिंसा व युद्ध पेट घेते. मग मन:शांती कोठली ? माझ्या दृष्टीने, बाह्य नियं-त्रणाविना, मानवान सख्याने, न्यायाने व सहकार्याने वागावे, हीच मानवाची खरी उत्क्रांती.''

त्यानंतरचे दोन प्रश्न देशांतील विद्यमान परिस्थितिसंबंधी मी विचारले. संमेलनाची वेळ होत आल्याने जयप्रकाशजींनी त्या प्रश्नांना सूत्ररूपे उत्तरे दिली. दुसरा प्रश्न मी जो विचारला, तो म्हणजे, " सध्या आपल्या देशात सर्व क्षेत्रांमध्ये नैतिक अध:पात झपाट्याने होत आहे, हे पाहून मला जो उद्वेग वाटतो, तो व्यक्तिनिष्ठ ( Subjective ) आहे की वस्तुनिष्ठ ( Objective ) आहे ? माझ्या वार्धक्यामुळे मला सध्याची परिस्थिती उद्वेगकारक वाटत आहे की खरोखरीच परिस्थिती तशी आहे ? ''

" परिस्थिती तशी आहे – फार भयानक आहे. ''

" मग यावर उपाय काय ? '' मी सहजच प्रश्न केला. ,' ग्रामदान हाच त्यावर तोडगा आहे काय ? ''

" समाजांत साधुसंतांचे सद्विचार पसरले पाहिजेत. त्यांचा परिणाम होतोच. त्याशिवाय ग्रामदानाप्रमाणे, भौतिक परिस्थितीत बदल केल्यानेही, हा अध:पात नाहीसा होईल, असा मला विश्वास वाटतो.

" सध्या राष्ट्राची राजकीय परिस्थिती ज्या वेगाने घसरत आहे, ती तशीच घसरत गेली तर, राष्ट्रात अराजक माजेल, असे आपल्याला वाटते काय ?''-मी.

" परिस्थिती चिंताजनक तर खचित आहे, पण मानवी बुद्धी स्वस्थ बसत नाही. ती त्यावर तोड काढीत असते. त्यामुळे मला येथे अराजक माजण्याचे भय वाटत नाही. उदाहरणार्थ, स्वार्थासाठी पक्षांतर करण्याची लाट नुकतीच उसळली होती, पण ती थोपविण्यासाठी एक समिती नेमण्यात आली आहे. तिचा मी एक सभासद आहे. त्या समितीचा परिणाम अशा पक्षांतरांना आळा घालण्यात होईल, अशी उमेद मला वाटते.''

या मुलाखतीतील जयप्रकाशजींचा प्रत्येक शब्द प्रांजळतेने व प्रामाणिकपणाने भरलेला होता, आणि प्रत्येक वाक्यात नम्रभाव व निरहंकार ओतप्रोत भरलेला होता.

प्रांजलता व नम्रता या जयप्रकाशजींच्या दोन अलौकिक गुणांचे साक्षात दर्शन घेऊन व त्यांना कृतज्ञ भावाने अभिवादन करून, मी तेथून संतुष्ट मनाने बाहेर पडलो, तेव्हा माझ्या मनात विचार आला,

"कुणी सांगावे,आज ना उद्या या सत्ताविन्मुख माणसाचे हाती आपल्या सर्व राष्ट्राची अंतिम सत्ता येईलही ! कदाचित् जागतिक प्रगतीचे एक सूत्रधार, अशीही भूमिका या महापुरुषाच्या वाट्यास नियती आणून देईल. ''



विनोबा भावे

७

# विनोबांच्या पदयात्रेत

पवनारच्या पवित्र परिसरात पाय ठेवताच मन मांगल्याने भरून जाते. धाम नदीचे पाणी वारा वाटा खडकावरून उड्या घेत येते व छोटे छोटे धबधबे निर्माण करते. काठावर गांधीजींची स्मृती म्हणून बांधलेली भव्य छत्री दृष्टी वेधून घेते. उजव्याहाताच्या उंचवटयावर चढून गेले की, राम-भरत – मिलापाचे नागरी थाटाचे टुमदार मंदिर दिसते.

सीता--रामाची मंदिरे भारतात असंख्य आहेत, पण राम-भरताचे हे एकमेव मंदिर असावे. श्रीराम, भरत, सीता, लक्ष्मण व हनुमान यांची काळया पाषाणाची मूर्ती विनोबाजींना पूर्वी, ऋषी-शेती करीत असताना, जमिनीत सापडली. सीतामाई पुराणकाली जनक राजाला अशीच शेती करताना सापडल्या होत्या. हा त्यांचा पुनर्जन्मच म्हणायचा ! जनकराजासारखाच ५० लाख एकर जमिनीचा हा विरागी धनी त्यांना पित्यासारखा लाभला. राम-जन्मापासून राम-निर्वाणापर्यंतच्या पाचसहा प्रसंगांच्या अशाच पुरुषभर उंचीच्या मूर्ती भू-मातेने विनोबाजींना 'दान' केल्या आहेत. हे खरे 'भू-दान !'

प्रभु रामचंद्रांच्या त्या विविध प्रतिमांना वंदन करीत करीत, मी विनोबांच्या सन्निध गेलो. तो दिवस शुक्रवार

होता. ता. ३ जुलै १९६४ रोजी सकाळी ९ वाजता मी त्या ‘परंधामा’त प्रवेश केला. धाम नदीच्या पलीकडचे (परं) ते स्थान, श्रेष्ठ (परं) स्थान शोभण्यासारखे आहे. माझ्याबरोबर उमरावतीचे श्री. हरिहरराव देशपांडे होते आणि श्रीमती जानकीदेवी बजाज, त्यांच्या कन्या सौ. मदालसा व एक ब्रह्मवादिनी समोर बसल्या होत्या. अखिल भारतातील बारा स्त्रियांना ब्रह्मविद्येचे शिक्षण देण्याची योजना विनोबांनी तेथे सिद्ध केली आहे. ते स्वतः व त्यांचे दोघे बंधु श्री. शिवाजीराव व श्री. बाळकोबा हेहि ब्रह्मसूत्रादींचे अध्यापन करीत असतात. कुष्ठरोग्यांच्या सेवेला सर्व जन्म वाहिलेले श्री. मनोहर दिवाण व श्री. बाळुभाई मेहता हेहि दोन पर्णकुटीत तेथे साधना करीत आहेत.

आता विनोबांचे शरीर म्हणजे पिकले पान ! वैद्यवरांनी विश्रांतीचा सल्ला दिला असला,तरी पहाटेच ते वर्ध्याला जाऊन १० मैलांची पद-यात्रा करून आले होते. त्यांच्या डोक्यावर हिरवे फडके होते, तरी त्यांचे केस काळे दिसत होते. फक्त दाढी शुभ्र होती. कानांनी कमी ऐकू येत आहे, डोळ्यांनी कमी दिसत आहे, स्मृतीने कमी आठवत आहे, तरी मुद्रिते तपासण्यापासून शेती खणण्यापर्यंत सारी कामे विनोबा आपल्या शरीराकडून करवून घेत आहेत–आणि मुख्य म्हणजे मनाची टवटवी, ज्ञानाची लालसा, चित्ताची प्रसन्नता कायम आहे. त्यांच्या जीवनांतील, रस शुष्क झालेला नाही. त्यांत आनंद आहे, विनोद आहे, प्रकाश आहे. गीतेतील कर्म, ज्ञान, भक्ति या तिन्ही योगांचा आविष्कार सध्या तरी विनोबाजींइतका अन्यत्र सापडणे अशक्य आहे, असे मला वाटले.

प्रभातींचा समय, प्रशांत स्थान व प्रिय श्रोतृवर्ग यामुळेच की काय, विनोबांशी अर्धापाऊण तास जो सुख-संवाद झाला, तो प्रसन्न, संतोषकारक व ज्ञानदायक झाला. यापूर्वीच्या माझ्या तीनचार मुलाखतींपेक्षा हा आगळाच अनुभव मला आला. एक रसाळ, पक्व फळ, असे विनोबांचे मन आता झालेले दिसले– जणु महात्माजींचेच मनो–मार्दव तेथे अवतरले आहे. मी तर काय ? ‘तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया’ याच विनम्र व जिज्ञासु वृत्तीने कोणाकडेही जातो. याच भूमिकेने मी विनोबांना चार प्रश्न विचारले.

त्यांची उत्तरे त्यांनी मनमोकळेपणी व हसत हसत दिली, ती अशी–

**प्रश्न**–पुण्यातील तुळशीबागेच्या विश्वस्तांची आपल्याला विनंती आहे की, आपण पुण्यास याल, तेव्हा आमच्या राम–मंदिरात येऊन आपण प्रवेश करावा. पूर्वी गांधीजी हरिजनांसह येणार होते, तेव्हा विश्वस्तांनी विरोध केला होता. त्याचे परिमार्जन आपण आल्याने होईल, त्याला आपली संमती आहे काय ?

**उत्तर**–मी पुण्यास केव्हा येतो, कोण जाणे. आणि आता हरिजनांना मंदिर–प्रवेश कोठे हवा आहे ? ते तर बौद्ध होऊन राहिले आहेत. त्यांना मंदिरात आणण्यात आता काय स्वारस्य ?

**प्रश्न**–दारू-बंदीसंबंधी आपले मत अद्याप प्रगट का झाले नाही?

**उत्तर**–दारूबंदीसंबंधी मी माझे मत प्रगट करण्याची जरूरी आहे काय ?

**प्रश्न**–ते उघड आहे. पण महाराष्ट्र सरकारच्या दारूबंदी धोरणाविषयी आपला आपला अभिप्राय व्यक्त करणार होता, तो केव्हा करणार ?

**उत्तर**–वसंतराव नाईकांनी (महाराष्ट्राचे मुख्य मंत्री) मला सांगितले, दारुबंदी व्हावी म्हणूनच आम्ही हे धोरण आखलेले आहे. त्यांच्या शब्दावर मी विश्वास ठेवतो. 'तुमचेकडून कागदपत्र आल्यावर मी माझे मत देईन,' असे मी सांगितले. पण अद्याप त्यांच्याकडून कागद आले नाहीत.

**प्रश्न**–मग यांतून जनतेला आपले मार्गदर्शन कसे लाभणार ?

**उत्तर**–मी असे सुचविले आहे की, अप्पा पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन, अण्णा सहस्रबुद्धे, रा. कृ. पाटील, आचार्य भिसे, अशा पांचजणांना जी योजना मान्य असेल, ती मला मान्य आहे. पण त्या समितीचीही सभा अद्याप झाली नाही.

**प्रश्न**–दारूबंदीइतकाच सिनेमा-बंदीचाही प्रश्न महत्त्वाचा आहे. संस्कृतीला सुरुंग लावण्याचे कार्य सिनेमा करतात. आपले 'गीता-प्रवचन' शंभर दिवस वाचून तरुणांच्या मनावर जो शुभ संस्कार होतो, तो एक सिनेमा पाहून पुसला जातो. आपण मागे इंदुरास सिनेमा-पोस्टर्स फाडण्याचे आंदोलन सुरू केले, पण तेवढ्याने भागणार नाही. रशियाप्रमाणे सिनेमाधंद्याचे राष्ट्रीयीकरणच झाले पाहिजे. त्यामुळे

कलेला थोडा कमीपणा येईल, पण संस्कृतीचा धोका टळेल. तरी आपण केंद्रीय मंत्र्यांना असा सल्ला द्याल काय ?

**उत्तर**–जसे शिक्षण, तसेच सिनेमा हेही सरकारनेच आपल्या हाती ठेवावयास पाहिजे. ज्या देशात ब्रह्मचर्याची आवड आहे किंवा मुलांची आवड आहे, ते सरकारी चित्रपट चांगले निघतात. रशियांत तसे घडत आहे.

**प्रश्न**–माझा शेवटचा प्रश्न वैयक्तिक आहे. ज्ञानेश्वरीचा अभ्यास मी सुरू केला आहे. तो पुरा झाल्यावर तरुण पिढीसाठी विषयशः गद्य अनुवाद लिहिण्याचा माझा विचार आहे. तो कितपत उपयुक्त आहे ?

**उत्तर**–शिवाजीने (विनोबाजींचे बंधु) ज्ञानेश्वरीतील शब्दांची सूची तयार केली आहे. विषयांची सूची एका ग्रंथात झालेली आहे. ज्ञानेश्वरी ही टीकाग्रंथ नाही, तर धर्मग्रंथ आहे. शंकराचार्यांचे भाष्य गीतेवरील टीकाग्रंथ आहे. 'अमानित्व' शब्दावर त्यांनी दोन वाक्यांतच भाष्य केले. पण ज्ञानेश्वरांना करायचे आहे ' धर्म–संकीर्तन'. समाजाला संपूर्ण आचारधर्म शिकवायचा आहे. म्हणून त्यांनी अमानित्व अंगी असलेल्या माणसाचे वर्णन करण्यासाठी आठ–दहा ओव्या खर्ची घातल्या. तुकारामांची गाथा भक्तिग्रंथ आहे पण धर्मग्रंथ नाही. कुराणांत असे सांगितलेले आहे की, ईश्वर प्रत्येक देशासाठी एकएक निरोप्या पाठवीत असतो. तसे ज्ञानोबा महाराष्ट्रासाठी ईश्वराचे निरोप्ये आहेत.

* * *

दुसरी मुलाखतहि सांगण्यासारखी आहे. ती पुढीलप्रमाणे

( स्थळ – निपाणीचे निवासस्थान ) ( काळ – ता. २१ मार्च १९५८ )

**मी** -- जमनालालजी बजाज यांच्या रोजनिशीत मला अशी नोंद आढळली की, 'तीन वर्षात ब्रह्मप्राप्ती करून घेईन असे विनोबा म्हणतात,' त्या संकल्पाप्रमाणे आपल्याला ब्रह्म–प्राप्ती झाली का?

**विनोबा** – (हसत) ब्रह्म–प्राप्ती कसली ? भ्रम–प्राप्तीच ती ! काही एका भ्रमानेच मी भ्रमण करीत होतो.

**मी** — त्या भ्रमाचे तरी स्वरूप काय ?

**विनोबा**– 'प्राप्ती' होण्यासारखे परके काहीच नसते. 'अस्ति' हीच जाणीव व्हावयास हवी. हा अनुभवाचा प्रश्न आहे.

**मी** – तसा अनुभव आपल्याला आला आहे काय ?

**विनोबा**– ज्याला अनुभूती आली तो ती सांगत नाही आणि जो सांगतो त्याला ती आलेली नसते.

**मी** – ब्रह्मानंद ही आत्मिक आनंदाचीच अवस्था आहे काय ? त्या अवस्थेत मग्न असलेला सिद्ध पुरुष विश्वांतील घडामोडींकडे 'गुणा गुणेषु वर्तन्ते' या भावनेनेच पहातो काय ?

**विनोबा**– तसे कसे होईल ? तटस्थपणे न पहाता, तो कर्तव्य-बुद्धीने कर्म करीतच राहील.

**मी** — दुसरा प्रश्न सत्याग्रहासंबंधी. त्याचे सौम्य, सौम्यतर व सौम्यतम असे आपण तीन प्रकार सांगितले आहेत, पण त्यांची स्वरूपे काय आहेत ?

**विनोबा**–स्वरूपे परिस्थितीनुरूप प्रगट होतील. ती आधी निश्चित केलेली नाहीत. हिंसामय युद्धात काय म्हणतात ? एक शस्त्र दुबळे ठरले, तर त्याहून जालीम शस्त्र वापरा. तसेच, एक सत्याग्रह अपुरा पडला तर जालीम सत्याग्रह करा, अशी पूर्वी भाषा असे. ती मला रुचेना, सत्याग्रह सौम्यच असतो, तो उत्तरोत्तर सौम्यतर होत गेला पाहिजे.

**मी** – सौम्यतम सत्याग्रहाचे स्वरूप कोणते ?

**विनोबा**–खिरस्ताने काय सांगितले ? 'तुझा सदरा कोणी मागितला तर त्याला तू आपला कोट दे.' हा सौम्यतम सत्याग्रह. तो सदरा आपला आहे आणि म्हणून काहीही झाले तरी तो न देणे, हा आतापर्यंत सत्याग्रह मानला गेला. एका माणसाजवळ ३०० एकर जमीन होती. त्याला दोन मुले होती. त्यांना १००।१०० एकर जमीन देऊन बापाने स्वत:जवळ १०० एकर जमीन ठेवली. तिच्यामुळे दोन्ही मुलांत तेढ निर्माण झाली. तेव्हा मी एका मुलाला म्हटले, "बापाच्या जमिनीची लालसा तू कशाला बाळगलीस ? तू आपल्या वाटयाची १०० एकर जमीन त्यालाच देऊन टाक, म्हणजे सारी कटकट मिटेल."

**मी** – ईश्वरावरील श्रद्धेशिवाय सत्याग्रह होऊ शकेल की नाही?

एकादा नास्तिक, एकादा कम्युनिस्ट ईश्वर मानीत नाही, पण दुसऱ्या मानवाचे दु:ख पाहून तो दु:खित होतो, तर तो सत्याग्रह करण्यास योग्य ठरेल का ?

**विनोबा**– कोणा मानवाचा ईश्वरावर विश्वास नसला, तरी ईश्वराचा त्या मानवावर विश्वास असतो. मूल आईला विसरले, तरी आई मुलाला कशी विसरेल ? सर्व विश्वच ईश्वरमय आहे. एका जहाजाची गोष्ट आहे. तें समुद्रांतून प्रवासास निघाले, पण वाटेत किनाऱ्यावरील खडकावर एकदा इकडे तर एकदा तिकडे, असे आपटू लागले. कारण काय ? तर त्या खडकांत लोह–चुंबक होते. तसेच सर्व विश्वात ईश्वरी तत्त्व आहे. तुम्ही मुलांवर प्रेम करा, आईवर करा की वायकोवर करा, ते सर्व ईश्वरावरच प्रेम ठरते.



आचार्य कालेलकर

८

# आचार्य कालेलकरांच्या सहवासात

अशाच एका मंगल प्रभाती मी काकासाहेबांना भेटलो. गांधीजींसंबंधीचे माझे काही लेखन मी त्यांना वाचून दाखवित होतो. ते ऐकताना त्यांच्या मुखातून गांधीजींच्या आठवणी सहजगत्या उसळून बाहेर पडत होत्या. त्यातील बऱ्याचशा आठवणींचे ते साक्षी होते. अंशभागी होते-किंवहुना घटक-वा जनकही-होते. त्यांच्या 'झांकिया' पेक्षाही या निराळ्याच होत्या. आणि त्यांच्या प्रसन्न मुखातून स्नेहाळ वाणीने त्या ऐकण्याचा आनंद काही निराळाच होता. जिज्ञासूला आपल्याजवळील ज्ञान-भांडार मुक्त हस्ताने देण्यात त्यांनाही आनंदच वाटत होता. ज्ञानार्जन व ज्ञानदान हाच त्यांच्या जीवनाचा मुख्य छंद ! 'शिवो भूत्वा शिवं यजेत' या न्यायाने अहिंसेचे प्रतिपादन अहिंसक शैलीने-प्रेमळ जिव्हाळ्याने-ते करीत होते.

काकासाहेब वयाने ऐंशीच्या पुढे गेलेले असले (जन्म-१८८५) तरी त्यांची स्मृती तरतरीत आहे आणि ज्ञान संपादनाची व ज्ञान-दानाची 'तृष्णा तु तरुणायते !' त्यामुळे काकासाहेब म्हणजे एक "चल विद्यापीठच" होत. बहिरेपणा हाच काय तो त्यांच्या म्हातारपणाच्या ध्वजासारखा दिसतो. बाकी, खांदा उडविण्याची संवय त्यांना पूर्वीपासूनच आहे. पांढरीशुभ्र दाढी, सुदृढ शरीर

आणि ज्ञानाचे मधुकुंभ साठविलेले, यामुळे ते अर्वाचीन काळातील ऋषिमुनी-सारखे वाटतात. त्यांच्याशी दोन घटका बोलले तरी वेदवेदांतापासून भारताच्या घटनेपर्यंत आणि प्लेटो–ॲरिस्टॉटलपासून शॉ–रसेलपर्यन्त पौरस्त्य–पाश्चात्य देशातून व हजारो वर्षांच्या कालपथावरून प्रवास करून आल्यासारखे वाटते. व्यास–वाल्मिकीपासून टागोर–अरविंदा-पर्यन्तच्या कवींचे दर्शन ते बोलता बोलता घडवितात–आणि तेही किती सहजतेने नि सस्मित मुद्रेने ! श्रोता अज्ञानी असला तरी त्याला न दुखविता, त्याला गोडीगुलाबीने समजावून सांगण्याची त्यांची हातोटी असामान्य आहे. त्या शीतल–सुगंधी ज्ञानजलात चार दिवस अवगा-हन करण्याची संधी मला १९५९ च्या जून महिन्यात मुंबई येथे मिळाली.

पारिजातकाच्या झाडाखाली आपण उभे आहोत आणि वरून कोमल–धवल पुष्पांचा वर्षाव आपल्या डोक्यावर होत आहे, असा अनुभव त्यांच्याशी संवाद करताना येतो. 'Light and sweetness' या इंग्रजी शब्दांनी सूचित होणारे सारे चातुर्य व माधुर्य त्यांच्या संभाषणात भरलेले असते. सर्वस्पर्शी ज्ञान, विशाल अनुभव व गाढ रसिकता यांचा संगम त्यांच्या वाणीत आढळतो. त्यामुळे श्रीज्ञाने-श्वरांनी वर्णिल्याप्रमाणे–

सहजे मलयानिलु मंदु सुगंधु। तया अमृताचा होय स्वादु।
आणि तेथेचि जोडे नादु। जरी दैवगत्या॥

अशा त्रिगुणांनी नटलेल्या वाणीतून जे विचार मला ऐकावयास सापडले, त्यातील काही थोडे सुवर्णकण, प्रश्नोत्तररूपाने, पुढे देत आहे.

**प्रश्न**– म. गांधींचा अनासक्तियोग व लो. टिळकांचा निष्काम कर्मयोग यात अंतर आहे काय ?

**उत्तर**–तत्त्वत: तसे अंतर नाही. भर कशावर हाच प्रश्न. लोक-मान्यांचा भर कर्मयोगावर, तर गांधीजींचा अनासक्तीवर. दोघांनाही कर्म मान्य; दोघांनीही जन्मभर कर्मयोगच आचरिला. पण भक्तीला स्थान लोकमान्य टिळकांच्या बुद्धीत आहे, तर बापूजींच्या हृदयात ते आहे.

**प्रश्न**–गीता–म्हणजे एकंदर भारत आणि रामायण–हे केवळ


अनु. ७६५७९ ... वि. ... बा.वा.
क्रमांक ... ३६४९ नोंद दि. ३०।२।७९

रुपक आहे, हे गांधीजींचे मत आपल्याला कितपत मान्य आहे ?

**उत्तर**–रामायण–भारतातील घटना ऐतिहासिक असाव्यात. ते प्रत्यक्ष घडलेले सत्य–प्रसंग असावेत. पण कृष्ण म्हणजे ज्ञान, अर्जुन म्हणजे साधक इत्यादि रूपक जमेल तितके वाल्मीकींनी व व्यासांनी वसविलेले दिसते. त्यांच्यापूर्वी राम–कृष्णांच्या कथा समाजात प्रचलित असाव्यात. त्यांना महाकाव्याचे स्वरूप त्यांनी दिले. रामायणात " धर्मेण शपे " असे प्रयोग सर्वत्र आहेत. देवाची शपथ कोठेही नाही. देवाशिवाय धर्म असू शकतो, 'देव--समाज ' हा केवळ नास्तिकांचा एक पंथ आहे आणि तो त्याग, सेवा, बलिदान या गुणांची जोपासना करतो. देव नाकारणाऱ्या त्या पंथाच्या संस्थापकाचे नावसुद्धा आहे– 'देव भगवान ! '

**प्रश्न**– धर्माचा आधार आजच्या समाजाला कितपत होऊ शकतो?

**उत्तर**–शास्त्र–प्रामाण्य याचा अर्थ अद्यतन ज्ञान–प्रामाण्य. हिंदु-धर्माला एक प्रमाण ग्रंथ नाही, हेच त्याचे वैशिष्टच. मी अमेरिकेतील एका चर्चमध्ये व्याख्यान देताना सांगितले, " तुम्ही जसे कॅथालिक, प्रॉटेस्टंट इत्यादि पंथांचे अनुयायी असला, तरी एकाच येशूचे उपासक आहात, तसे खिस्ती, महंमदी इत्यादी धर्मही पंथच मानावेत. म्हणजे सर्वधर्मसमभाव जागृत होईल. त्याला मी ' सर्वधर्मसमभाव ' म्हणतो.

**प्रश्न**–आपण थोर कलावंत आहात. हिमालयाची उंच शिखरे पहाताना किंवा--समुद्र लाटांचे तांडव अवलोकन करताना आपल्या-मधील जी कलावृत्ती जागृत होते, जी प्रेरणा, स्फूर्ती, प्रतिभा उत्पन्न होते, तीच अन्य परिस्थितीत, समजा रस्ते झाडताना किंवा संडास साफ करताना, होते का ? परिस्थितीचा परिणाम कलावृत्तीवर किती होतो?

**उत्तर**– तसा काही होतो असे मला वाटत नाही. मी संडास-सफाई केलेली आहे– काँग्रेसच्या तीन अधिवेशनांत तेच खाते मजकडे होते, पण ते काम करण्यातही मी रममाण होत असे--कलात्मक दृष्टीने ते करीत असे. शौचकूप इतका स्वच्छ ठेवला पाहिजे की, तेथे भोजन करण्यासही किळस वाटता कामा नये. प्रश्न दृष्टीचा आहे. मोर सुंदर आहे, पण कावळा का कमी सुन्दर आहे ? गोरी स्त्री सुन्दर दिसत असेल, पण मी पाहिलेल्या आफ्रिकन स्त्रीच्या डोळ्यातील

लाजाळूपणा काय कमी सुंदर होता ?

**प्रश्न**– याचा अर्थ जगात अ-सुन्दर असे काहीच नाही, असा करावयाचा का ?

**उत्तर**– तो विचार वेदांत्याचा आहे, पण कलावंताला नानाविध सौन्दर्ये दिसतात, एवढेच मला म्हणावयाचे आहे.

**प्रश्न**–अहिंसा हा अकरणात्मक (Negative) शब्द वाटतो, त्याएवजी 'प्रेमभाव' हा भावात्मक (Positive) शब्द वापरला, तर योग्य होईल काय ?

**उत्तर**– बापूंनी अहिंसेचा आशय पुष्कळच विस्तृत केला आहे. अमेरिकेतील नीग्रो पुढारी डॉ. किंग याने प्रेमा (Love) पेक्षा सद्भाव (Agape) हा शब्द अधिक चांगला असे म्हटले आहे. व्याख्या करणे कठीण असते. प्लेटोने मानवाची व्याख्या "बिनपंखाचा द्विपाद प्राणी" (Featherless Biped) अशी केली. तेव्हा त्याचा शिष्य अरिस्टॉटल याने एक कोंबडा आणला, त्याचे पंख कापले व म्हटले, 'हा ह्या प्लेटोचा मानव.' ज्याचे अंत:करण शुद्ध असते तो मानव सामर्थ्यवान बनतो. टेनिसनने आपल्या Lancelot काव्यात एका सरदाराचे वर्णन His strength was more than the strength of the ten, for his heart was pure " असे केले आहे. त्याचे भाषांतर मी पूर्वी असे काहीसे केले होते, "प्रमदा–कर–कमलाते मम कर–भ्रमर स्पर्शिला कधी नाही !"

**प्रश्न**– वेदकाली पुनर्विवाहाला बंदी नव्हती असे महात्माजींनी लिहिले आहे, त्याला आधार कोणता ?

**उत्तर**– वेदांमध्ये असे मंत्र आहेत की, पती मेल्यावर स्त्रीने त्याच्या चितेवर निजावे, नंतर चितेवरून उठून तिने आपले जीवन पुढे चालू करावे. यापेक्षा कोणा स्त्रीने प्रत्यक्ष पुनर्विवाह केल्याचा उल्लेख वेदात असल्याचे मला स्मरत नाही.

**प्रश्न**– गांधीजींच्या अपरिग्रह व्रताचे पूर्ण पालन व्यवहारात कितपत शक्य आहे ?

**उत्तर**– या बाबतीत मी गांधीजींना एक गोष्ट सांगितली होती, ती अशी--बंगालचे संत गौरांगप्रभु हे पूर्ण विरक्त होते. मिळेल ते खावयाचे हे त्यांचे व्रत. जेवणानंतर मुखशुद्धीसाठी ते हिरड्याचा

तुकडा चघळत. जेवण झाले की त्यांचे शिष्य कोठून तरी हिरडा आणीत. एका दूरदर्शी शिष्याला वाटले, रोजरोज हिरडा आणण्यामुळे गुरुजींना तो मिळण्यास उशीर होतो, तेव्हा दोन-तीन हिरडे आणून ठेवावे. दुसरे दिवशी गुरूने मागताच हिरड्याचा तुकडा मिळाला. तो कसा ? याचा खुलासा कळल्यावर ते म्हणाले, "हे आपल्या अपरिग्रह व्रताशी विसंगत आहे. ज्या वेळी जे मिळेल ते खाणे, न मिळाले तरी खंत करू नये. संग्रह करू नये हे लक्षात ठेवावे." गांधीजी प्रत्येक वस्तूचा– पाण्याचाही–उपयोग काटकसरीने करीत, थांत त्यांची हीच बुद्धी असे.

**प्रश्न** – गांधीजींची ईश्वरावर असीम श्रद्धा होती, तशीच प्रार्थनेवर होती. तीमुळे त्यांच्या जीवनांत दैवी शक्ती आली, असे वाटते का ?

**उत्तर** – बापूंना तसे वाटत होते हे खरे. एकदा रात्रीची सभा आटोपून ते निजले, ते प्रार्थना करण्याचे विसरून. ती चूक दुसरे दिवशी पहाटे त्यांच्या ध्यानी आली. तेव्हा त्यांचा जीव कासावीस झाला, त्यांना दरदरून घाम सुटला. हे त्यांनी मला सांगितले. तेव्हां मी त्यांना एक गोष्ट सांगितली. एक खलिफा रोज न चुकता प्रार्थना करी. एक दिवस प्रार्थना न करताच तो निजला. मध्यरात्र झाली आणि त्याला कोणी हालवून जागे केले व म्हटले "ऊठ, प्रार्थना कर."

"मला प्रार्थनेचे स्मरण करून देणारा तू कोण ? देवदूत की काय ? " त्याने कृतज्ञतेने विचारले.

"नाही, मी इब्लिस–सैतान–आहे."

"मग तू माझ्या पुण्यकृत्याची इतकी काळजी का करीत आहेस?

"ती न केली, तर पुण्य–संचय वाढेल अशी मला भीति आहे. पूर्वी एकदा तू प्रार्थना करण्याचे चुकला होतास. दुसरे दिवशी तुला पश्चाताप झाला, अन् तू देवाची इतकी आळवणी केलीस की, प्रार्थना केल्याने मिळण्याच्या दसपट पुण्य तुला त्या अनुतापाने मिळाले. तसे आता न व्हावे म्हणून मी उठवावयास आलो." बापूजींची वृत्ती अष्टौप्रहर प्रार्थनामयच असे.

असे स्वैरालाप, असे कथा–विनोद आणि असे विचार-वैभव– यांत चार दिवस सुस्नात होण्याची संधी मला लाभली, हे मी माझे भाग्य समजतो.



मावळंकर

१

## मावळंकरांचा प्रेमळपणा

" सभासदो ! – सभापतिजी ! ! ' अशी ललकारी तांबड्या डगल्यांतील राजदंडधारी चोपदाराने खड्या आवाजांत दिली. सारी लोकसभाआदराने नि:स्तब्धपणे उभी राहिली आणि खास दरवाजातून, कर्पूरगौर वर्णाची, हास्यमुखाची, शुभ्र खादीचा सु–व्यवस्थित वेष परिधान केलेली दादासाहेबांची मूर्ती धीरगंभीर पावले टाकीत, अध्यक्षांचे खुर्चीजवळ जाऊन उभी राहिली आणि राष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून आलेल्या सर्व लोकप्रतिनिधींना, आपले मस्तक किंचित् लववून, जणू मातृभूमीलाच अभिवादन करून, त्या खुर्चीवर वसली; पण वसली न वसली वाटावी इतक्या अलगदपणे वसली व सर्व सभागृह आपल्या दृष्टी-पाताने जणू आपल्या कवज्यांत घेऊनच की काय, सभेच्या कामकाजास तिने एकदम किल्ली दिली. सभेचे कामकाज चालू असेपर्यन्त, मानेवर खडा ठेवल्याप्रमाणे, डोळ्यांत तेल घालून, सभासदांच्या व मंत्र्यांच्या बोलण्यांतील शब्दां–शब्दांवर सक्त नजर ठेवून, राज्य–रथाचे सारथ्य अत्यंत दक्षतेने व कुशलतेने, लोकसंग्राहक वृत्तीने पण न्याय–निष्ठुर धोरणाने, कोणाला इकडे–तिकडे रेषामात्रही चळून देता, ती एकटी प्रसन्न – प्रशांत मूर्ती करीत

असलेली, मी दिल्ली येथे १९५३ चे डिसेंबरात प्रत्यक्ष पाहिली, तेव्हाच दादासाहेबांचे महत्त्व व वैभव, सत्ता व कर्तव्य, मान व आदर किती आहे यांची जाणीव मला यथार्थपणे झाली. गंगा काशीसच पहावी, ताजमहाल पौर्णिमेच्या चांदण्यातच अवलोकावा, पंढरीचा विठोबा आषाढीच्या यात्रेतच लुटावा; वक्ता व्यासपीठावर, राजा सिंहासनावर व सेनापति रणांगणावर न्याहाळावा; तसे खरे दादासाहेब लोकसभेत अध्यक्षांचे काम करतानाच चमकताना दिसत व दरारा उत्पन्न करीत.

याच्या अगदी उलट टोकांचा अनुभवहि मला आठवतो, तो १९३५ सालचा. त्या वेळी मी नुकताच 'केसरी'च्या संपादक-शाखेवर आरूढ झालो होतो. – महत्त्वाकांक्षेच्या धुक्यात वावरत होतो. माझे दुसरे पुस्तक 'सर्वश्रेष्ठ हिंदुधर्म' हे बक्षिसाच्या तुऱ्यानिशी नुकतेच प्रसिद्ध झाले होते.

त्याचे गुजराती भाषांतर बडोद्याच्या कोणा तरुणाने केले होते व मजकडे पहाण्यासाठी पाठविले होते.

पण मी काय पहाणार ? मला गुजराती कुठे येत होते ? मग मी ते हस्तलिखित कोणाला दाखवावे ? याचा विचार मी करीत होतो. तोच शुभ्र पोशाखातील हिमधवल कांतीची दादासाहेबांची सस्मित मूर्ती माझ्या खोलीवरून झप्झप् पुढे गेली. पुण्यात आले की केसरी कार्यालयाला भेट द्यावयाची असा दादासाहेबांचा परिपाठ होता. माझ्या मनात स्वार्थी कल्पना चमकून गेली. दादासाहेब परत निघाले, तेव्हा मी त्यांना विनंतीपूर्वक पृच्छा केली. 'माझ्या पुस्तकाचा गुजराती अनुवाद आपण पाहून द्याल काय ?'

"हो ! हो ! अवश्य पाठवा. एका आठवड्यात वाचून परत करीन." तत्काळ मुक्तकंठाने उत्तर आले.

त्या वेळी मला कल्पना नव्हती की, केवढ्या थोर माणसाला आपण किती क्षुद्र काम सांगत आहो ! रस्त्यावर पडलेली सुई उचलून देण्यास हत्तीला सांगावे तसाच हा प्रकार होता. कारण, तेव्हाही दादासाहेब प्रतिष्ठेच्या किती तरी पायऱ्या चढून लौकिकाच्या उंच मनोऱ्यावर जाऊन बसलेले होते. तेव्हाही त्यांनी महाराष्ट्र व गुजरात

या दोन्ही समाजांचा आदरभाव संपादिलेला होता. अहमदावादेचे नगराध्यक्ष पद त्यांना लाभलेले होते. तेथील मजूर–मालकांची मान्यता त्यांना मिळालेली होती. गुजरात काँग्रेस समितीचे चिटणीस म्हणून त्यांनी सरदार वल्लभभाईवरोवर काम करून त्यांचेकडून वाहवा मिळविली होती. अहमदावाद येथे भरलेल्या राष्ट्रसभेचे ते सरचिटणीस होते. खेडा सत्याग्रह आणि असहकारितेचे व कायदेभंगाचे राष्ट्रीय आंदोलन यांत सक्रिय भाग घेऊन व कारावास भोगून देशभक्तांच्या श्रेणीत त्यांनी उच्च स्थान प्राप्त करून घेतले होते आणि युरोपचा दौराही करून ते आले होते. पण 'याञ्चा मोघा वरमधिगुणे' या न्यायाने मी थोरांपाशी लहान याचना केली आणि ती सफल झाली. हीच त्या थोराची थोरवी !

पुढे ही जाणीव मला झाली, तरी मोह सुटेना. दादासाहेवांच्या सौजन्याचा फायदा मी अधिकाधिक घेऊ लागलो–किंवा खरे म्हणजे ते निःसंकोचपणे देऊ लागले. मला कळत नाही की, मजवर अखंड प्रेम ते का करीत होते ? अकारण वैरी भर्तृहरीने वर्णिले आहेत, पण अकारण लोभ ठेवणारे कोण ? राज्यपदावर विराजणारे असे दोन थोर पुरुष मजवर अकारण लोभ करणारे मला लाभले, हा केवळ योगायोग ! हे दोघे म्हणजे श्री. दादासाहेव मावळंकर व लो. ना. वापूजी अणे. वयाचे अंतर ध्यानी न घेता आणि सत्ता व संपदा, कीर्ती व कर्तृत्व, सेवा व सन्मान या सर्व बावतीत जमीनअस्मानाइतके अंतर असूनही या दोन महाभागांनी मला जवळीक का दाखविली, हे मला पडलेले गोड कोडे आहे.

पण त्या कोड्यात अडकलेलो असतानाच मी त्या जवळीकेचा फायदा प्रसंगपरत्वे उचलला. १९४५मध्ये मी माझ्या गांधी-चरित्राला पूरक म्हणून 'गांधी–जीवन कथा' नावाचा आठवणीचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला. त्याला प्रस्तावना कोणाची घ्यावी ? गांधीजींच्या सन्निध दीर्घकाळ असलेले व त्यांच्या विश्वासास पात्र ठरलेले दादासाहेव आपल्या पुस्तकास प्रस्तावना देतील का ? अशी लोभस लालसा माझ्या मनात लुकलुकली.

'पाहू या विचारून तरी.' असे म्हणून मी भीतभीतच दादा-

साहेबांना पत्र लिहिले. आणि काय ?

लगेच होकार आला आणि योग्य वेळी प्रस्तावना पण आली.

प्रस्तावनेच्या बाबतीत मी त्यांना विशेष त्रास पुढे एकदा दिला. 'राष्ट्र-नायक नेहरू' या माझ्या पुस्तकास दादासाहेबांचीच प्रस्तावना मिळावी, असा माझा संकल्प, लेखनास सुरुवात करण्याचे आधीच, मी मनाशी धरला होता. १९५३ च्या डिसेंबरात मी, या चरित्रासाठी मुलाखती घ्याव्यात म्हणून, दिल्लीस गेलो होतो. प्रथम दादासाहेबांना भेटलो. संध्याकाळची वेळ होती. दिवसभराचे सभापतीचे काम आटोपून ते दमून पलंगावर पहुडले होते. निजल्या निजल्याच तास दीडतास ते बोलले. प्रस्तावनेविषयी विनंती करताच, सभापतीच्या अभिनिवेशाने, त्यांनी तत्काळ निर्णय (Ruling) दिला की, "इच्छा आहे पण वेळ नाही." पण माझा निश्चय त्यांचीच प्रस्तावना घेण्याचा. म्हणून त्यांच्या सवडीने, त्यांच्या सर्व अटी सांभाळून, मी प्रस्तावना मिळविण्याचे आश्वासन तर मिळविले. पुढे पुस्तकाची मुद्रिते मधून मधून मी पाठवित गेलो. पुस्तक छापून पूर्ण झाले, तेव्हा दादासाहेब दौऱ्यावर होते. बरोबर त्यांनी मुद्रिते बाळगली होतीच. पण प्रवासात वाचन-लेखनास सवड कोठली ? अहमदाबादेस गेल्यावरच प्रस्तावना पाठवीन, असे त्यांचे पत्र आले. पण तेथे तरी उसंत कोठली ? प्रवासात प्रवासाची कामे आणि घरी घरची !

शेवटी मी जरा तगाद्याचे व तातडीचे पत्र त्यांना लिहिले. ता. २५ ला प्रस्तावना मिळावीच, त्यासाठी प्रकाशन अडून राहिले आहे, असे कारणहि दिले.

त्याचा परिणाम काय झाला ? "प्रस्तावना येत आहे." ता. २५ रोजी सकाळी तारच आली ! आणि दोनच तासांनी 'तांतडीच्या टपालाने' प्रस्तावनेचे भलेमोठे पाकिट पण आले. "मला वेळ अजीबात नाही, पण तुमची खोटी होऊ नये म्हणून मी प्रस्तावना लघुलिपीने लिहून घेऊन पाठविली आहे. त्यामुळे इंग्रजीतून ती पाठवावी लागली. तिचा मराठी अनुवाद तुम्ही करावा." असे त्यांनी लिहिले होते.

मी ती प्रस्तावना मराठीच्या पेहरावात मुद्रित रूपाने, दुसरेच दिवशी, त्यांच्या अवलोकनार्थ पाठविली. तीत दोनचारच बदल त्यांनी

केले, पण ते अर्थाच्या सूक्ष्म छटा दाखविणारे होते. असा बारकावा दादासाहेब सर्वच बाबतीत पहात. कायद्याच्या कानामात्रेप्रमाणे साध्या पत्राची छाननी ते करीत.

दिल्लीस मी त्यांचे भेटीस दोन--तीनदा गेलो.

जाताना मोटार मिळे. पण त्यांचे निवासस्थान ज्या 'अकबर रोड' वर, तेथून परत जाण्यास संध्याकाळचे वेळी, मोटार मिळणे मुष्किलीचे. पायी जावे तर रस्ता अनोळखी. रस्ता विचारावे तर कोणी भेटण्याची शक्यता कमी. पण या अडचणी बोलून का दाखवावयाच्या ? परंतु न बोलताच दुसऱ्यांची दुःखे जाणण्याची कला दादासाहेबांचे अंगी होती. पहिले दिवशी त्यांनी आपण होऊनच आपल्या स्वतःच्या मोटारीतून घरी पोचविले; पण त्याहीपेक्षा विशेष आस्था दुसरे दिवशी दिसून आली. तेव्हा त्यांची मोटार दुसरीकडे गेली होती. इतक्यात एका राज्याचे एक उपमंत्री त्यांच्या भेटीस आले होते. ते परत निघाले, तेव्हा दादासाहेब त्यांना हळूच म्हणतात, "माझ्या या मित्रांना त्यांच्या घरी पोचविण्याची तसदी आपण घ्याल का ?" मी न बोलताच दादासाहेबांनी माझी इतकी काळजी घेतली, त्याबद्दल मला किती धन्यता वाटली ! माझे अंतःकरण त्यांच्या सौजन्याच्या भाराने दडपून गेले !

तिसरे दिवशी जरा सलगीने मी दादासाहेबांना विचारले,

"सभापतीला कामे तरी कोणती असतात ? जसे राज्याचे गव्हर्नर, तसे पार्लमेंटचे स्पीकर–केवळ प्रतिष्ठेचे प्रतीक ! त्यांना ना काम ना जबाबदारी, असे लोक मानतात, ते खरे का ?"

दादासाहेबांनी लगेच आपल्या एका सेवकाला बोलविले आणि एक फाइल आणविली. ती उघडून ते मला म्हणाले, "हे पहा, परवा एका सभासदाने लोकसभेत प्रश्न विचारला, तेव्हा मी त्याला मनाई केली. ही मनाई बाहेरच्या लोकांना एका वाक्यात दिसते. पण ती मनाई करण्याची कारणे कोणती, हे सांगण्यासाठी चार पानांचे हे पत्र मी त्याला पाठविले होते; त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला होता."

दादासाहेबांनी सरकारपक्षाला व लोकपक्षाला अप्रिय असे

निर्णय अनेकवार दिले असूनही त्यांचेवर सर्वांचा विश्वास व प्रेम टिकून का होते, याचे कारण हे !

राज्य-घटनेतील नुकसानभरपाईचे कलम वदलण्याचा कायदेशीर प्रयत्न चालला होता. तो दादासाहेबांना तत्वत: अमान्य होता. म्हणून एक काँग्रेसजन, एक नागरिक म्हणून त्यांनी पंतप्रधान नेहरूंना, टाईप केलेल्या दहा पानांचे सविस्तर पत्र पाठवून, आपला विरोध प्रगट केला होता. त्यांचा असा निर्भिडपणा व स्पष्टवक्तेपणा जितका तीक्ष्ण व तिखट असे, तितकाच त्यांचा प्रेमळपणा व मनमोकळेपणा मधुर व पारदर्शक असे. त्यामुळे त्यांचे मतविरोधकही त्यांचे मित्र असत. त्यांच्या आजारीपणात पं. नेहरू त्यांचेकडे जाऊन घटका न् घटका वसत. 'लोकसभेचा प्रेमळ पिता आज गेला !' असे जे सौहार्दाने ओथंवलेले उद्गार पंडितजींनी त्यांच्या निधनानंतर लोकसभेत काढले, ते सर्वांच्या हृदयातील गाढ भावनेला वाचा फोडणारेच होते.

केवळ पैशाच्याच नव्हे तर पत्रांच्या वावतीतही ते अत्यंत दक्ष असत. मी त्यांना संयुक्त महाराष्ट्र व मुंवई या प्रश्नावर चार ओळींचे पोष्टकार्ड लिहिले होते. त्याचे उत्तर म्हणून आपल्या कामाच्या गर्दीतही ता. १७ नोव्हेंवर १९५५ रोजी त्यांनी लेखवजा उत्तर पाठविले. त्यात त्यांच्या विचारांची गांधीवादी बैठक स्वच्छ दिसते.

पुण्यास मी एकदा दादासाहेबांना माझ्या घरी बोलावले होते. माझे दहावीस सहकारी जमले होते. तेव्हाच्या खाजगी बैठकीत त्यांनी सांगितलेल्या दोन गोष्टी, वीस वर्षानंतरही, माझ्या लक्षात राहिल्या आहेत. एक तर ते म्हणाले, "माझ्यामागे जे राज-तेज आहे, ते विसरून तुम्ही सर्वांनी माझ्याशी वागावे. माणूस या दृष्टीने माझेकडे पहा-सभापती म्हणून नव्हे."

'गांधीजींच्या राजकारणात आपण कसे पडलात ?' असा प्रश्न कोणी केला, तेव्हा त्यांनी एक प्रसंग सांगितला. ते म्हणाले, "काँग्रेसची बैठक आटोपून मी परत येत होतो. आगगाडीतून मी वाहेर पहात होतो. रस्त्यावर फाटके-तुटके कपडे अंगावर घातलेली पोरे मला एके ठिकाणी दिसली. का कोणास ठाऊक, पण त्या दारिद्र्याच्या

दृश्याने माझ्या विचारात क्रांती झाली आणि मी असहकारितेच्या चळवळीत पडलो.''

तशीच अहमदाबादचे नगराध्यक्ष असताना त्यांनी दीनाविषयी करुणा दाखविली. ते म्हणाले, "भंगीलोक मैल्याची पाटी डोक्यावर घेऊन रस्त्याने जात आहेत, त्या पाटीतील मैल्याचे ओघळ भंग्याच्या मुखावरून वहात आहेत, हे दृश्य मला मानवतेचा अपमान करणारे वाटले. मी लगेच त्या पाट्या बंद केल्या व बंद डब्याची योजना केली.''

* * *

सानेगुरुजींच्या उपोषणाचा प्रसंग. पंढरीचा विठोबा हरिजनांना खुला व्हावा, म्हणून त्यांनी निर्वाण मांडले होते. तेव्हा दादासाहेबांनी मध्यस्थी केली व दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून पंच या नात्याने निकाल दिला. ते सारे निकालपत्र 'महात्मा' मासिकात छापण्यास मी मागितले, तेव्हा ते त्यांनी लगेच पाठविले—केवळ प्रेमामुळे. त्यांचे चरित्र मी १९५६ साली मराठीत लिहिले व त्याचे गुजराती भाषांतरहि १९६७ साली प्रसिद्ध झाले.

अशा महापुरुषांचा संश्रय ही मी माझ्या
आयुष्यातील अमोल ठेव मानती.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रमांक ०.६.५१८९ वि. ग्रा. दा.
क्रमांक ३६४० नोंद दि. 30/3/09

◆ ◆ ◆

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. 92089 नों. दि ..........
वि. ग्रा ग्रं ...... क्र. ..........

IRBK-0112951

किंमत रु. ३-००

## आमची प्रकाशने

१. **श्रीज्ञानेश्वरीतील अमृतकण**

दा. न. शिखरे — किंमत ५ रुपये

ज्ञान, कर्म, भक्ति, भाषा इत्यादि विषयांवर ओव्या निवडून त्यांचा सुगम अर्थ देणारा हा ग्रंथ म्हणजे भावार्थ-दीपिकेचा दीपच.

२. **न्यायमूर्ति**

दा. न. शिखरे — किंमत ३ रुपये

पेशवाईतील रामशास्त्री प्रभुणे यांच्यासारखी निःस्पृह न्यायबुद्धि दाखविणाऱ्या एका अर्वाचीन न्यायाधीशाच्या जीवनावरील तरुणांना चटकदार वाटणारी रम्य कादंबरी.

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३३४ शुक्रवार पेठ, पुणे २